सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सेतू-अभ्यास

Bridge-Course

इयत्ता-सहावी

विषय-मराठी

(द्वितीय भाषा)

सुलभभारती

शैक्षणिक वर्ष २०२१-२२

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

सेतू अभ्यास (ब्रिज कोर्स) : - इयत्ता सहावी मराठी (द्वितीय भाषा) सुलभभारती

- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- प्रेरणा : **मा. वंदना कृष्णा**, (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मार्गदर्शक : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से.)
  आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  मा.राहुल द्विवेदी(भा.प्र.से.)
  राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- संपादक : **मा. दिनकर टेमकर**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- सहसंपादक : **डॉ.विलास पाटील**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- कार्यकारी संपादक : **डॉ. कमलादेवी आवटे,** उपसंचालक (भाषा व समता विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  नीता जाधव, उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता**,** मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- संपादन सहाय्य : **डॉ. नंदा भोर, अश्विनी नरवणे,** विषय सहायक, मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- निर्मिती गट प्रमुख : **नारायण मुदगलवाड** ,अधिव्याख्याता ,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था उस्मानाबाद ,
- निर्मिती गट सदस्य
  १) **माधुरी राऊत**, पदवीधर शिक्षक ,
  जि. प. शाळा नवघर , जिल्हा पालघर
  २**) सीमा महाडिक** , पदवीधर शिक्षक ,
  जि.प.प्राथ.शाळा चिरमोडी, ता.वेल्हे , जि.पुणे
  ३)**नितीन मेमाणे ,** पदवीधर शिक्षक,
  जिल्हा परिषद शाळा पांडे , ता. भोर ,जि.पुणे .
  ४) **प्रमोद वाघमोडे** , सहायक शिक्षक
  रा. जि.प.खारघर , पनवेल रायगड
  ५) **विनोद सिनकर ,** सहायक शिक्षक
  सरस्वती भुवन हायस्कूल औरंगपुरा , औरंगाबाद
  ६) **उमेश राऊत** , सहायक शिक्षक
  जि. प. शाळा नवघर , जिल्हा पालघर

शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड 19 च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधीनंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर सेतूअभ्यासात क्षेत्र,कौशल्य,संकल्पना व अध्ययन निष्पत्ती/क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे.विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संकल्पनाप्रमाणे 'जाणून घेऊ या' मध्ये संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी, 'जाणून घेऊ या' मधील संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या'** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व सराव करू यामध्येछ मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा,सर्जनशील व्हावे,अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **काही कृतींचा समावेश केला आहे.**या सदरांचा समावेश केला आहे. .
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ.ची मदत घ्यावी.
- . शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थी स्वप्रयत्नाने सोडवेल याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.

मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे

विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो,

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. तुमच खूप खूप कौतुक. या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस आपणाला मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासासाठी आपली पूर्वतयारी व्हावी, ही पूर्वतयारी करणे सोयीचे व्हावे,हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे. त्यासाठी तुम्ही काय करायचे?

एकूण ४५ दिवसाचा हा अभ्यास तुमच्यातील भाषिक कौशल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येक दिवशी दिलेला भागाचा अभ्यास करून त्यामध्ये दिलेल्या कृतींच्या उत्तरांचे लेखन तुमच्या वहीत करावयाचे आहे. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतींचा समावेश आहे. दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या.

जाणून घेऊ या, सक्षम बनू या,सराव करू या संबोधाने तुमच्याशी प्रत्यक्ष शक्य नाही तरी अप्रत्यक्ष संवाद साधायचा प्रयत्न केला आहे. जाणून घेऊ या मध्ये असलेल्या कृती सहज सोडवता येतील अशा आहेत,तसेच सक्षम बनू या मधील आशय समजून घेताना व कृती सोडवताना तुम्ही आपल्या पालकांची किंवा शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या.सराव करू या मधील कृती मात्र स्वप्रयत्नाने सोडवा.

तुम्ही चौदा दिवस या सेतूचा अभ्यास केल्यानंतर पंधराव्या दिवशी तुम्हाला एक चाचणी दिली आहे. ती सोडवून आपल्या शिक्षकांकडून तपासून घ्या.याप्रमाणे तिसाव्या दिवशी आणि शेवटी पंचेचाळीसाव्या दिवशी अशा तीन चाचण्या सोडवायच्या आहेत. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा व उत्तरांची खात्री आपल्या शिक्षकांकडून करून घ्या.

हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

सेतू अभ्यासक्रम इयत्ता सहावी मराठी (द्वितीय भाषा) सुलभभारती अनुक्रमणिका

क्रमांक	क्षेत्र	घटक / उपघटक	दिवस
१	श्रवण	कविता गायन	पहिला
२	भाषण संभाषण	कविता सादरीकरण	दुसरा
३	श्रवण	सूचनेप्रमाणे कृती करा	तिसरा
४	भाषण संभाषण	चित्रगप्पा , चित्र वर्णन	चौथा
५	श्रवण भाषण	गप्पा अनोपचारिक औपचारिक	पाचवा
६	श्रवण	चित्र वर्णन चित्र गोष्ट	सहावा
७	संभाषण वाचन	चित्रकथा	सातवा
८	वाचन	चित्रकथा वाचन	आठवा
९	भाषाभ्यास	उदगार चिन्ह , पूर्णविराम	नववा
१०	लेखन	श्रुतलेखन	दहावा
११	वाचन	संवाद वाचन	अकरावा
१२	भाषण संभाषण	संवाद सादरीकरण/ भूमिका अभिनय	बारावा
१३	लेखन	चित्र निरीक्षण व लेखन	तेरावा
१४	लेखन	पूर्णविरामचा लेखनात वापर	चौदावा
१५		चाचणी क्रमांक १	पंधरावा
१६	भाषाभ्यास	नाम ओळख	सोळावा
१७	वाचन	विनोद वाचन	सतरावा
१८	भाषण संभाषण	भाषिक खेळ	अठरावा
१९	लेखन	प्रश्नचिन्हांचा लेखनात वापर	एकोणिसावा
२०	लेखन	स्वल्पविराम लेखनात वापर	विसावा
२१	वाचन	प्रकट वाचन	एकविसावा
२२	लेखन	लिंग	बाविसावा
२३	भाषाभ्यास	जोडशब्द	तेविसावा
२४	लेखन	अनुलेखन	चोविसावा
२५	श्रवण	गोष्ट सांगणे	पंचविसावा
२६	भाषण संभाषण	अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे	सव्विसावा
२७	वाचन	जाहिरात वाचन	सत्ताविसावा
२८	लेखन	चित्रावरून गोष्ट लेखन	अठठाविसावा
२९	भाषण संभाषण	अनुभव कथन	एकोणतिसावा
३०		चाचणी क्रमांक २	तिसावा
३१	वाचन	कविता वाचन	एकतिसावा
३२	वाचन	बातमी वाचन	बत्तीसावा
३३	भाषाभ्यास	समानार्थी , विरुद्धार्थी शब्द	तेहतीसावा
३४	लेखन	नामे व सर्वनामांचा लेखनात वापर	चौतीसावा
३५	लेखन	क्रियापदाचा लेखनात वापर	पस्तीसावा

३६	भाषण संभाषण	नाट्यीकरण	छत्तीसावा
३७	लेखन	प्रसंग लेखन	सदोतीसावा
३८	भाषण संभाषण	माझा शब्द संग्रह	अडतीसावा
३९	वाचन	सूचनाफलक वाचन	एकोणचाळीसावा
४०	लेखन	सूचना लेखन	चाळीसावा
४१	वाचन	मूक वाचन	एकेचाळीसावा
४२	लेखन	मुद्द्यांवरून गोष्ट लेखन	बेचाळीसावा
४३	लेखन	अनुभव लेखन	त्रेचाळीसावा
४४	लेखन	निबंध लेखन	चव्वेचाळीसावा
४५		चाचणी क्रमांक ३	पंचेचाळीसावा

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - श्रवण
कौशल्य / कृती : - कविता गायन **दिवस : - पहिला**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.७ / इयत्ता पाचवी – ५.१६.१४

जाणून घेऊ या :


१)शिक्षकांनी सोप्या कविता चालीत साभिनय म्हणून घ्याव्यात.

२)गाण्यातील शब्द , उच्चार , चाल , चढउतार याकडे लक्ष वेधून घेणे .

३)उदा. ससा तो ससा

गीत योग्य चालीत साभिनय म्हणून दाखविणे व म्हणून घेणे .

सक्षम बनु या :



१. नाच रे मोरा

• ऐका. म्हणा.

नाच रे मोरा, आंब्याच्या वनात
नाच रे मोरा नाच!

ढगांशी वारा झुंजला रे
काळा काळा कापूस पिंजला रे
आता तुझी पाळी
वीज देते टाळी
फुलव पिसारा नाच ।। १ ।।

झर झर धार झरली रे
झाडांची भिजली इरली रे
पावसात न्हाऊ
काहीतरी गाऊ
करून पुकारा नाच ।। २ ।।

थेंब थेंब तळ्यात नाचती रे
टपटप पानात बाजती रे
पावसाच्या रेघात
खेळ खेळू दोघांत
निळ्या सोंगड्या नाच ।। ३ ।।

पावसाची रिमझिम थांबली रे
तुझी माझी जोडी जमली रे
आभाळात छान छान
सात रंगी कमान
कमानीखाली त्या नाच ।। ४ ।।

– ग. दि. माडगूळकर

शिक्षकांनी स्वतः गीत गायन कसे करावे याचे प्रात्यक्षिक दाखवावे .

उदा. गाण्यातील शब्द , उच्चार , चाल , चढउतार याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे .

चला सराव करु या :

शिक्षकांनी गाणी म्हणून दाखवणे . गाणी म्हणण्यास प्रोत्साहन देणे . मार्गदर्शन करणे .

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - भाषण संभाषण
कौशल्य / कृती : - कविता सादरीकरण दिवस : - दुसरा

अध्ययन निष्पत्ती-5.16.01,5.16.14 /6.16.08

जाणून घेऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'नाच रे मोरा ' ही कविता साभिनय म्हणण्यास सांगावे.
•विद्यार्थी कविता चालीवर, तालासुरात व साभिनय म्हणतात का हे शिक्षकांनी जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'नाच रे मोरा' ही कविता तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावी. विद्यार्थ्यांना लक्षपूर्वक ऐकण्यास व पाहण्यास सांगावे.

•शिक्षकांनी कवितेची एकेक ओळ म्हणून दाखवावी. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मागे म्हणावे.
•आता संपूर्ण कविता चालीवर, तालासुरात व साभिनय म्हणवून घेतील.
• शिक्षकांनी कवितेवर आधारित काही प्रश्न विचारावेत.
•नमुना प्रश्न :-
१)या कवितेत कोणत्या ऋतूचे वर्णन आलेआहे? २) ही कविता कोणाला उद्देशून म्हटलीआहे?३) पाऊस पडण्याआधी वातावरणात कोणते बदल होतात? ४)जशी पावसाची रिमझिम तशी अजून आवाज दर्शक शब्द सांगा. ५) पावसावर आधारित अजून कोणकोणती गाणी तुम्हांला माहीत आहेत? ६)कवितेत आलेले नादमय शब्द सांगा.
• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पावसाशी संबंधित शब्द विचारावेत.विद्यार्थ्यांनी सांगितलेले शब्द फळ्यावर गोलचक्राभोवती लिहावेत.
•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फळ्यावरील तयार झालेले पावसाचे संकल्पनाचित्र वहीत लिहिण्यास सांगावे.
•शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील इतर कवितांचे साभिनय गायन घ्यावे.

सराव करू या

•विद्यार्थ्यांनी कविता सामूहिक,गटात व वैयक्तिकरित्या म्हणण्याचा सराव करावा.
• विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील इतर कविता ऐकण्याचा व म्हणण्याचा सराव करावा.
• पावसावर आधारित कवितांचा संग्रह करावा.वर्गात त्यांचे साभिनय सादरीकरण करावे.
• संकल्पना चित्रातील पावसाशी संबंधित शब्दवापरून छोट्या कविता कराव्यात.

इयत्ता :- ६ वी

क्षेत्र : - श्रवण

कौशल्य / कृती : - सूचनेप्रमाणे कृती करा **दिवस : - तिसरा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.१०

जाणून घेऊ या :

१)शिक्षकांनी सूचना द्याव्यात व त्याप्रमाणे कृती करण्यास सांगावे .

२)स्वतः काही कृती करून दाखवाव्यात .


उदा. १)पक्ष्याप्रमाणे पंख हलवा.

२)मोरासारखा पिसारा फुलवा.

३)स्वतःच्या नावातील अक्षराएवढ्या टाळ्या वाजवा .

४)दोन्ही हात डोक्यावर ठेवून पाच उड्या मारा.

सक्षम बनु या :



१)शिक्षकांनी कृती करण्याबत योग्य सूचना द्याव्यात.

२)इयत्ता ५ वी पान क्रमांक ९ प्रमाणे कृती करून घ्याव्यात.

चला सराव करु या :

१)शिक्षकांनी काही सूचनांची यादी बनवावी.

२)तोंडी सुचना देऊन त्याप्रमाणे कृती करून घ्यावी.


३)सूचनांसाठी चित्रांचा वापरही करावा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - भाषण संभाषण
कौशल्य / कृती : - चित्रगप्पा / चित्रवर्णन दिवस : - चौथा

अध्ययन निष्पत्ती-5.16.02 /6.16.01/6.16.18

जाणून घेऊ या

•शिक्षकांनी पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ दाखवावे. चित्राविषयी मुलांशी गप्पा माराव्यात .चित्रांविषयी प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना बोलते करावे.





चित्राविषयी विद्यार्थी कितपत बोलतात हे विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून जाणून घ्यावे.


सक्षम बनू या

•शिक्षकांनी चित्रवर्णन कसे करावे याविषयी मार्गदर्शन करावे.

जसे-चित्रवर्णन करताना चित्राचे सूक्ष्म निरीक्षण करणे,चित्रातील व्यक्ती काय करत आहेत?

ते एकमेकांशी काय बोलत असतील ?चित्रातील प्रसंग ,स्थळ, काळ लक्षात घेणेइ.

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील चित्र दाखवून चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.



•विद्यार्थ्यांनी चित्राचे निरीक्षण केल्यानंतर चित्राचे वर्णन करण्यास सांगावे.

•चित्रवर्णन करताना पूर्ण वाक्यात,अचूक शब्दांत बोलण्यास सांगावे.

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील प्रसंगचित्र दाखवावे. चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे.



• विद्यार्थ्यांना वरील चित्रावर आधारित प्रश्न विचारण्यास सांगावे.

सराव करू या

•विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील,किशोर मासिकातील, गोष्टींच्या पुस्तकातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांचे वर्णन करावे.

•विद्यार्थ्यांनी दोन गट करावे. एखादे प्रसंगचित्र घेऊन त्यावर एकागटाने प्रश्न विचारायचे व दुसऱ्या गटाने उत्तरे द्यावीत. अशा प्रकारे एकमेकांना चित्रावर आधारित प्रश्न विचारण्याचा व उत्तरे देण्याचा खेळ खेळावा.

इयत्ता :- ६ वी

क्षेत्र : - श्रवण भाषण

कौशल्य / कृती : - गप्पा औपचारिक / अनौपचारिक **दिवस : - पाचवा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.१४ , ६.१६.२

जाणून घेऊ या :

१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिसरात काय काय आहे ?

आजूबाजूच्या परिसराची माहिती सांगणारे , वर्णन करणारे प्रश्न विचारावेत.

मुलांशी गप्पा माराव्यात .

सक्षम बनु या :

मुलांना त्यांच्या आवडणाऱ्या विषयावर बोलण्यासाठी प्रश्न विचारावे.

१)तुला कोणता रंग आवडतो ?

२)तो रंग तुला का आवडतो ?

३)तुझ्याकडे त्या रंगाच्या कोणकोणत्या वस्तू आहेत ?

इ. प्रश्न तसेच इतरही काही प्रश्नपेढी शिक्षकांनी बनवावी.

चला सराव करु या :

शिक्षकांनी एखादी घटना मुलांना सांगावी . प्रसंग सांगावा.

तसेच एखादा अनुभव त्यांना विचारावा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - श्रवण
कौशल्य / कृती : - चित्रवर्णन / चित्रगोष्ट **दिवस : - सहावा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.१४ , ६.१६.७ / इयत्ता पाचवी – ५.१६.२

जाणून घेऊ या :

१)शिक्षकांनी मुलाना चित्र दाखवावीत.

२)चित्रावर प्रश्न विचारावेत .

उदा. चित्रात काय दिसते .

३)प्रश्न विचारत असतानाच चित्राचे वर्णन करावे.

४)काही विचारप्रवर्तक प्रश्न विचारावे. ज्यामुळे विद्यार्थी चित्रापलीकडे जाऊन विचार करतील .

यासाठी विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी संबंधित उपलब्ध चित्रांचा उपयोग करावा .

सक्षम बनु या :



१)चित्र दाखवून मुलांच्या मदतीने त्याचे वर्णन करून घ्यावे,

२)चित्रावर आधारित विचार प्रवर्तक प्रश्न विचारावेत .

परिसरावर आधारित विविध चित्रांचा उपयोग करावा.

उदा. बगीचा , मैदान , शाळा , गाव , बाजार , जत्रा इ.

चला सराव करु या :



१)शिक्षकांनी चित्र दाखवून प्रश्न विचारावे.

२)चित्राचे मुलांकडून वर्णन करून घ्यावे.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - संभाषण / वाचन
कौशल्य / कृती : - चित्रकथा दिवस : - सातवा

अध्ययन निष्पत्ती-5.16.01,5.16.03,5.16.14/6.16.02

जाणून घेऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना 'काळेभूत 'हीचित्रकथा वाचण्यास सांगावी.




•शिक्षकांनी चित्रकथेविषयी चर्चा करावी. प्रत्येक चित्रात कायकाय दिसते ते विचारावे. चित्रकथेवर आधारित प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना चित्रकथा कितपत समजली हेजाणून घ्यावे.जसे-

१) गोष्टीत किती पात्रे आहेत? २) गोष्टीतील घडलेल्या घटना क्रमाने सांगा.३)गोष्टीचे शीर्षक काय असावे असे तुम्हांला वाटते?

सक्षम बनू या

•शिक्षकांनी चित्रकथेविषयी मार्गदर्शन करावे. चित्रकथेत काहीपात्रं असतात, घटनाक्रम असतो, पात्रातील संवाद, चित्रकथेची सुरुवात व शेवट, कथेचे शीर्षकइ.

•शिक्षकांनी खालील 'हत्तीचे चातुर्य 'या चित्रकथेचे क्रमाने निरीक्षण करण्यास सांगावे.



•शिक्षकांनी चित्रकथेविषयी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून बोलते करावे. प्रत्येक चित्रात कायकाय दिसते ते सांगा. १)चित्रकथेत कोणकोणती पात्रे आहेत? २)मुले काय करत आहेत? ३)मुले निघून गेल्यानंतर सश्यांनी काय केले? ४)ससे खड्ड्यात का पाहत असतील?५) ससे फळीने काय करत असतील? ६)सश्यांना चेंडू काढण्यासाठी मदत कोणी केली? व कशी? ७)गोष्टीत शेवटी काय घडले असेल ?

सरावकरूया

•विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक, किशोरमासिके, मुलांसाठीचे साप्ताहिकअंक इ.मध्ये आलेल्या चित्रकथा वाचाव्यात.•चित्रकथेतील प्रत्येक चित्राविषयी बोलावे. •चित्रकथेवर आधारित प्रश्न एकमेकांना विचारावेत.

• आपल्या कल्पनेने स्वत:ची एक चित्रकथा बनवावी व त्याला योग्य शीर्षक द्यावे.

इयत्ता :- ६ वी

क्षेत्र : - वाचन

कौशल्य / कृती : - चित्रकथा वाचन दिवस : - आठवा

अध्ययन निष्पत्ती :- १) ५.१६.०६ २) ६.१६.०९


जाणून घेऊ या :-

१)शिक्षकांनी मुलांकडून कथेचे प्रकटवाचन करून घ्यावे. वाचन घेताना मुलांच्या अडचणी समजून घ्याव्यात

२)कथेवर आधारित चर्चा करून, प्रश्नोत्तरे घ्यावीत.

३)मुलांच्या आकलनात येणाऱ्या समस्या जाणून घेणे अपेक्षित आहे.

(इयत्ता -पाचवी, सुलभभारती 'सिंह आणि बेडूक' पृष्ठक्र. १२)



९. सिंह आणि बेडूक

• ऐका. वाचा. लक्षात घ्या.

एका एक राहायचा. त्याला त्या कंटाळा आला आणि तो नव्या राहायला गेला. एकदा मोठ्याने गरजला. त्या अनेक तसेच काही बेडूकही राहत होते. त्यांनी यापूर्वी पाहिले नव्हते. त्यांचा पुढारी म्हणाला, ''कोणीतरी मोठा आवाज काढत आहे. आता मीही मोठा आवाज काढतो.'' मोठा आवाज काढला. हा आवाज नवीन होता. वाटले, 'कोणीतरी आपल्याला आव्हान देत आहे, आपण सावध राहिले पाहिजे.' आपली गर्जना थांबवली. तो शांत उभा राहिला. मोठमोठ्याने ओरडत पुढे पुढे सरकू लागला. त्याला पाहिले व त्याचा आवाज ऐकला. वेगाने पुढे सरकला. डोक्यावर पाय दिला. गयावया करू लागला. त्याला सोडून दिले.

– मुकुंद तळवलकर

सक्षम बनू या :-

१)शिक्षकांनी वरील कथेचे आदर्श वाचन करून दाखवावे त्यातील संवादाचे वाचन करावे व विद्यार्थ्यांना पुन्हा वाचन करण्यास सांगा

२)चित्र आणि मजकूर यांचा संबंध समजावून द्यावा.

३)कथेतील पात्रांविषयी चर्चा करावी.

सराव करू या :-

१)विद्यार्थ्यांच्या भावविश्वाशी निगडित कथा शिक्षकांनी उपलब्ध करून द्याव्यात व या कथा वाचनाचा सराव घ्यावा.

२) चित्रे व मजकूर यांचा संबंध प्रस्थापित करण्याचा सराव घ्यावा.

३)विविध साहित्यातील चित्रकथा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना वैयक्तिक व गटात वाचनाचा सराव घ्यावा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - भाषाभ्यास
कौशल्य / कृती : - उद्गार चिन्ह / पूर्णविराम **दिवस : - नववा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.२०

जाणून घेऊ या :

१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांना " **पूर्णविराम** व **उद्गार चिन्ह** " **(. !)** याची ओळख द्यावी .

२)वाक्य पूर्ण झाल्यावर **.** असे चिन्ह देतात त्या चिन्हास " **पूर्णविराम** " म्हणतात.

जसे – दारावरची बेल वाजली **.**

३)उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखवणाऱ्या शब्दाच्या शेवटी **!** असे चिन्ह देतात त्यास

" उद्गार चिन्ह " म्हणतात.

जसे – अरेरे **!** तू पडलास .

विविध उदाहरणाद्वारे " **पूर्णविराम** व **उद्गार चिन्ह** " **(. !)** समजावून द्यावा.

सक्षम बनु या :

शिक्षकांनी खालील प्रमाणे वाक्य देऊन अधिक सराव घ्यावा.

१)खालील वाक्यात योग्य जागी **पूर्णविराम .** व **उद्गार चिन्ह !** द्या.

अ)मायाने पाकीट उघडले
ब)अरे वाह छान कपडे आहेत

चला सराव करु या :

खालील वाक्यात योग्य जागी **पूर्णविराम .** व **उद्गार चिन्ह !** द्या.

१)शाब्बास छान खेळलास
२)बापरे किती मोठा साप आहे
३)तिने पिशवी खाली ठेवली

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - श्रुतलेखन दिवस : - दहावा

अध्ययन निष्पत्ती-

पाचवी:-05.16.08सहावी:-06.16.17

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वरचिन्हयुक्त शब्दांचे /वाक्यांचे श्रुतलेखन द्यावे.

उदा .शिक्षण, पोळी,फणस, डोंगर, नारळ, गौतम, कुदळ

आम्ही शाळेत वृक्षारोपण केले.

वरील शब्दांचे/वाक्यांचे लेखन करून घेऊन ते तपासतात व चुकीचे शब्द दुरुस्त करून पुन्हा लिहिण्यास सांगावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी श्रुतलेखनाचे नियम समजून सांगताना ऱ्हस्व दीर्घ उच्चार असलेल्या शब्दांचे श्रुतलेखन कसे करतात हे उदाहरणासह समजावून द्यावे .श्रुतलेखन करताना पूर्णविराम ,स्वल्पविराम,प्रश्नचिन्ह इत्यादी विरामचिन्हांचा वापर कसा करतात ते उदाहरणासह स्पष्ट करावे .

उदा .१.संजयने बाजारातून भाज्या,फळे, किराणामाल,मिठाई आणली.

२.शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला.

अशा प्रकारची आणखी काही वाक्य विद्यार्थांना श्रुतलेखनासाठी द्यावी .विद्यार्थ्यांनी लिहिलेले वाक्य तपासावे .विद्यार्थ्यांच्या झालेल्या चुका दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहिण्यास सांगावे .

सराव करू या

1) शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करून गटप्रमुखाला पुस्तकातील एक छोटासा उतारा श्रुतलेखनासाठी सांगण्यास सांगावे .लिहून झाल्यानंतर मुलांना पुस्तक काढून स्वतःचा उतारा स्वतः तपासण्यास सांगावे. चुकीची दुरुस्ती करण्यास सांगावे.

२)शाळेतील सूचना फलक,गावातील दुकानांवरील पाट्यायांचे वाचन करा. ते वहीत लिहून काढा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - संवाद वाचन दिवस : - अकरावा

अध्ययन निष्पत्ती :-१)५.१६.०१२)६.१६.१२


जाणून घेऊ या :-

१) शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून खाली दिलेल्या संवादाचे प्रकटवाचन करून घ्यावे.

२)वाचन घेताना पुढील मुद्दे विचारात घ्यावे समजपूर्वक वाचन करतात का, पात्रांचा विचार करून वाचन करतात का, विरामचिन्हाचा वापर करून योग्य वाचन करतात का, आवाजातील चढउतार दर्शवतात का-.. इत्यादी.

३)मुलांच्या वाचनातील अडचणी, त्रुटी जाणून घ्याव्यात.

(इयत्ता - पाचवी सुलभारती पृष्ठ क्र.५३ 'फुलपाखरू आणि मधमाशी')



२८. फुलपाखरू आणि मधमाशी

• ऐका. वाचा.

(सकाळी बागेत एक फुलपाखरू स्वच्छंदपणे फिरत आहे. एक मधमाशी त्याच्याजवळ येते.)

फुलपाखरू : काय ग मधू, इतक्या घाईनं कुठे चाललीस ?

मधू : अरे, मध गोळा करायला.

फुलपाखरू : थांब ना जरा. बघ आजची सकाळ किती सुंदर आहे !

मधू : हो रे, तिकडचं कारंजं बघ कसं थुईथुई नाचतंय.

फुलपाखरू : बागेतली फुलझाडं किती सुंदर दिसताहेत ! फुलांचा सुवास सगळीकडे दरवळतो आहे.

मधू : मंद वारा सुटला आहे. कसं छान वाटतंय; पण मला थांबायला वेळ नाही.

फुलपाखरू : थांब थोडा वेळ. आपण या गुलाबाच्या फांदीवर बसून जरा गप्पा मारूया.

मधू : नको रे बाबा ! इकडे तिकडे तुझ्यासारखा मजेत वेळ घालवायला मला सवड नाही. मी सकाळपासून निघाले खरी, पण मध काही गोळा करून झालेला नाही.

फुलपाखरू : मध गोळा करण्याचं काम कुणी दिलं तुला ?

मधू : आमच्या राणीमाशीनं दिलं.

फुलपाखरू : अगं, तरीपण तुला थोडा वेळ घालवायला काय हरकत आहे ?

मधू : तुझं मन मोडायला वाईट वाटतं मला, पण करणार काय ? काम तर कुणाला चुकलेलं नाही बाबा !

फुलपाखरू : काय गं, एवढा मध गोळा करून तुला काय मिळणार ? शेवटी ती माणसांचीच धन ना !

मधू : असं कसं ? आम्हांलाही मध लागतोच ना ! मध किती औषधी आहे आणि किती उपयोगी पडतो ते तुला माहीत आहे.

फुलपाखरू : हो. मधात औषधी गुण असतात, हे खरं आहे का गं ?

मधू : अरे, मध हा औषधीच आहे.

फुलपाखरू : मध मला खूप आवडतो; पण माझ्याशी गप्पा मारायला तुला वेळ नाही, हे मात्र मला बिलकुल आवडत नाही.

मधू : कामात मग्न राहणं, यातसुद्धा आनंद असतो. तुझंच बघ ना ! तुझ्यासारख्या सुंदर फुलपाखराला बघून किती आनंद

५३

सक्षम बनू या :-

१)संवाद म्हणजे काय याविषयी मुलांशी चर्चा करावी. जास्तीत जास्त मुलांना बोलण्यास प्रवृत्त करावे, प्रोत्साहन द्यावे. संवादात दोन किंवा अधिक व्यक्ती असू शकतात त्या व्यक्ती मधील संभाषण संवादात असते हे विद्यार्थ्यांना सांगणे.

२)शिक्षकांनी मुलांच्या वाचनातील दोष, त्रुटी कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना करावी. उदाहरणार्थ. संवादाचे आदर्श वाचन करून दाखवणे, विरामचिन्हांचा वापराविषयी सांगणे, समजपूर्वक वाचन करण्यासाठी सांगणे...इत्यादी.

सराव करू या :-

१)संवाद निर्मिती कुठे कुठे होत असते याविषयी शिक्षकांनी मुलांशी चर्चा करून करावी.

२)मुलांना वाचण्यासाठी विविध संवाद तयार करावे, वाचनाचा भरपूर सराव द्यावा.

३)विविध पात्रांचे संवाद मुलांकडून वाचून सराव करून घ्यावा.

इयत्ता :- ६ वी

क्षेत्र : - संभाषण / वाचन

कौशल्य / कृती : - संवाद सादरीकरण , भूमिकाभिनय दिवस : - बारावा

अध्ययन निष्पत्ती-5.16.01,5.16.02,5.16.12 /6.16.02 ,6.16.11,6.16.12

जाणून घेऊ या

•शिक्षकांनी खालील संवाद विद्यार्थ्यांना वाचनास द्यावा. विद्यार्थ्यांना पात्रे वाटून द्यावीत. विद्यार्थी योग्यप्रकारे संवाद म्हणतात का हे सादरीकरणातून जाणून घ्यावे.



सक्षम बनू या शिक्षकांनी संवादवाचन कसे वाचावे, संवादाचे सादरीकरण कसे करावे याबद्दल मार्गदर्शन करावे. संवाद म्हणताना आवाजातील चढउतार, हावभाव , पात्रांच्या भूमिकेशी समरस होऊन संवाद म्हणता येणे इ. बाबी लक्षात आणून द्याव्यात.

•शिक्षकांनी खालील प्रसंगातील संवाद विद्यार्थ्यांना वाचनास द्यावा. नंतर पात्रे वाटून द्यावी व संवादाचे सादरीकरण घ्यावे.

दिनू : फातिमा ये. बस.

फातिमा : दिनू, तू काय करतोस ?

दिनू : आईसाठी चहा करतोय. तुझ्यासाठीही करू का ?

फातिमा : (हसत-हसत) नको, मी चहा घेत नाही. काय रे ! एक कप चहा करण्यासाठी एवढं मोठं पातेलं ?

दिनू : काय बिघडलं ?

फातिमा : अरे, छोटं पातेलं घेतलं असतंस, तर पाणी लवकर उकळलं असतं.

दिनू : हे माझ्या लक्षातच आलं नाही.

फातिमा : अरे, छोट्या पातेल्यामुळे चहा लवकर झाला असता आणि हो ! इंधनाची म्हणजे गॅसचीही बचत झाली असती. समजलं ?

दिनू : समजलं. समजलं आणि लक्षातही आलं. दिनूने चहा कपात ओतला आणि आईला नेऊन दिला.

•शिक्षकांनी दोन व्यक्तींमधील काल्पनिक संवाद, प्रसंग सांगून भुमिकाभिनय करून घ्यावे उदा..कंडक्टर व प्रवासी, डॉक्टर व रुग्ण, शिक्षक व विद्यार्थी इ.

चला सराव करू या

•विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील, किशोर मासिकातील, बालसाहित्यातील आपल्याला आवडलेल्या प्रसंगाचे संवाद निवडावेत व वर्गात ,जोडीने/ गटाने सादरीकरण करावे.

•विद्यार्थ्यांनी संवादातील विषय प्रसंग,घटनाइ.वर चर्चा करावी.आपली मते मांडावी.
जसे – वरील इंधन बचतीचा संवाद.यावर विद्यार्थ्यांनी चर्चा करावी.आपल्या समस्या,आपली मते मांडावीत.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - चित्र निरीक्षण व लेखन **दिवस : - तेरावा**

अध्ययन निष्पत्ती :
इयत्ता सहावी – ६.१६.१४ , ६.१६.२

जाणून घेऊ या :



विद्यार्थ्यांना चित्र दाखवून 'याचित्रात काय काय दिसतंय, चित्र पाहूनत्याबद्दल मनात कोणते विचार येत आहेत,असे प्रश्न विचारून

बोलण्यास प्रवृत्त करावे.चित्रात जे पाहिले ले वहीत लिहायला सांगावे.

सक्षम बनु या :

चित्रात जे जे दिसतंय त्यांची नावे लिहिण्यास सांगावे. चित्रात कोणकोणत्या क्रिया घडत आहेत, त्या क्रियाच लिहायला सांगावे. चित्राबद्दल (उदा-पोहणे, पाणी भरणे) चित्राबद्दल सात-आठ वाक्यांचा परिच्छेद लिहायला सांगावे.

(वरील दोन्ही कृतींसाठी हवे ते चित्र घ्यावे.)

चला सराव करु या :

मुलांचे गट तयार करावेत. प्रत्येक गटाला काही चित्रे देऊन निरीक्षण करायला सांगावे. चित्रांचे निरीक्षण करून मनात कोणते विचार येतात यावर विद्यार्थी गटात चर्चा करतील. गटाने केलेल्या चर्चेतून चित्रवर्णन लिहितील. काही विद्यार्थी स्वतंत्रपणे प्रत्येक चित्रांचे वर्णन लिहितील.





इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - पूर्णविरामाचा लेखनात वापर **दिवस : - चौदावा**

अध्ययन निष्पत्ती :

05-16-09, 05-16-10, 05-16-11, 06-16-05, 06-16-16, 6616175 06-16-20

जाणून घेऊ या :

फळ्यावरील वाक्यात विद्यार्थ्यांना (.) हे चिन्ह दाखवून या चिन्हाला काय म्हणतात ते विचारावे. पुढील मजकूर फळ्यावर लिहून देऊन यात कोणते चिन्ह लिहायचे राहिले, कोठे राहिले ते विचारावे.

ही पाहा गाय गाय गवत खाते आपल्याला दूध देते गाय हा पाळीव प्राणी आहे

सक्षम बनुया :

- विद्यार्थ्यांना स्वतःबददल किंवा मित्राबददल चार-पाच वाक्य बोलायला सांगावे आणि तेच लिहायला सांगावे.त्यात पूर्णविराम कोठे व का द्यावा हे स्पष्ट करून सांगावे.तसेच याशिवाय पूर्णविराम संक्षिप्त रूपातही देतात, हेही स्पष्ट करून सांगावे. त्यासाठी उदाहरणे द्यावीत-

उदा.,इ. (इत्यादी) रु. (रुपये), ता. (तालुका), जि. (जिल्हा) याविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.

चला सराव करु या :

लेखनात पूर्णविरामाचा योग्य जागी वापर करण्याबाबत विद्यार्थ्यांचा वैयक्तिक व गटात सराव करून घ्यावा. त्यासाठी वाक्ये, परिच्छेद द्यावेत.खालील परिच्छेदात विरामचिन्हांचा योग्य वापर करून लिहा.

झाडे फार उपयोगी असतात झाडांमुळे सावली मिळते झाडांमुळे गारवा मिळतो झाडे जमिनीची धूप थांबवतात झाडे हवा शुद्ध ठेवतात झाडांमुळे प्रदूषण कमी होते सर्वांनी झाडे लावावी झाडे जगवावी झाडांचे जतन आणि संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे

●खालील वाक्यांमध्ये आवश्यक तेथे पूर्णविराम देऊन लिहा.

१) पु ल देशपांडे हे थोर साहित्यिक होते

३) म जोतिबा फुले हे थोर समाजसुधारक होते

3) सुरेश बी ए उत्तीर्ण झाला

४) आमच्या बागेत आंबे, पेरू, चिकू, सिताफळ इफळझाडे आहेत

इयत्ता :- ६ वी

क्षेत्र : - श्रवण / भाषण संभाषण / वाचन / लेखन

कौशल्य / कृती : - चाचणी क्रमांक – १ गुण – १५ दिवस : - पंधरावा


प्र.१ला पुढील सूचना ऐक आणि त्याप्रमाणे कृती कर. गुण२

१) हत्ती सारखे डुलत चाल. २) पक्ष्यांसारखे पंख पसरून उड.

३) कागदाची होडी करून पाण्यात सोडण्याची कृती कर. ४) धुतलेले कपडे वाळत घाल.

प्र.२रा पाठ्यपुस्तकातील कोणत्याही एका कवितेचे साभिनय सादरीकरण कर. गुण२

प्र.३रा पुढील चित्राचे निरीक्षण कर व चित्रातील व्यक्ती काय करत आहेत ते लिही. गुण२



_____

_____



_____

_____

प्र.४था शब्द ऐक आणि लिही. (शिक्षकांनी जोडाक्षरयुक्त ४ शब्द सांगावेत.) गुण२

---------- ---------- ---------- ----------

प्र.५ वा पुढील वाक्ये वाच आणि योग्य ठिकाणी पूर्णविराम, उद्गारवाचक चिन्ह वापरून वाक्य पुन्हा लिही. गुण२

१) शाब्बास छान चित्र काढलेस ----------

२) अरेरे फारच वाईट झाले ----------

प्र.६ वा पुढील चित्रातील व्यक्तीला तिच्या कामाबद्दल कोणते ३ प्रश्न विचारशील ते लिही. गण३



१)----------

----------२)----------

----------३)----------

प्र.७वा गोष्ट वाचा व अपूर्ण गोष्ट पूर्ण करून लिही. गुण२

कबीर शाळेला चालला होता. त्याला एक मुंगी पाण्यात पडताना दिसली. कबीरने वहीचे एक पान फाडले.

_____

_____

इयत्ता :- ६ वी

क्षेत्र : - भाषाभ्यास

कौशल्य / कृती : - नाम **दिवस : - सोळावा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.२०

जाणून घेऊ या :

शिक्षकांनी खालील रकान्यांचे वाचन घेऊन समजावून द्यावे .

व्यक्ती	वस्तू	गुण
अंजू , राम , दिनेश , आजी	घर , फोन , बस , रेल्वे	नम्रपणा

व्यक्ती , वस्तू , गुण यांच्या नावाना ' नाम ' म्हणतात .

वरीलप्रमाणे नाम म्हणजे काय ? शिक्षकांनी मुलाना उदाहरणाद्वारे समजवावे .

सक्षम बनु या :

खालील वाक्यातील नामे ओळख .

१)राम झाडावर चढला .

२)दिनेश शाळेत गेला आहे .

३)आजी , तुम्ही या जागेवर बसा .

रिकाम्या जागी योग्य नाम लिहा .

अ)---------- हा माझा जिवलग मित्र आहे .

ब)माझ्या दप्तरात ---------- , ---------- , ---------- या वस्तू आहेत .

शिक्षकांनी वरीलप्रमाणे मुलाना समजावून ' नामा ' चा सराव घ्यावा . आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे .

चला सराव करु या :

रिकाम्या जागी योग्य नाम लिहा .

१)---------- गवत खातो .

२)---------- पत्र लिहिले .

३)---------- पुस्तक वाचतो .

४)ते ---------- सुंदर आहे .

५)ते ---------- मोठे आहे .

६)---------- गोष्ट सांगते .

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - विनोदवाचन दिवस : - सतरावा

अध्ययन निष्पत्ती :-१) ५.१६.०१२) ६.१६.१५


जाणून घेऊ या:-

१)खाली उदाहरणादाखल दिलेला विनोद शिक्षकांनी मुलांकडून वाचून घ्यावा व त्याचे आकलन होते किंवा नाही याचा पडताळा घ्यावा.

२)या विनोदावर मुलांबरोबर चर्चा करावी.

३) विनोद वाचताना साध्या उताऱ्याप्रमाणे मुले वाचत असतील तर त्यावेळी शिक्षकांनी योग्य तो बदल सुचवावा.

(इयत्ता-पाचवी, सुलभभारती पृष्ठ क्रमांक-१०,' नमुनादाखल विनोद')


वाचू आणि हसू.

पेशंट : डॉक्टर, माझं वजन खूप वाढतंय. त्यामुळे माझी तब्येत ठीक राहत नाही.

डॉक्टर : तब्येत चांगली राहण्यासाठी रोज व्यायाम करा. मैदानी खेळ खेळा.

पेशंट : मैदानी खेळ तर मी रोज खेळतो. फुटबॉल, टेनिस, क्रिकेटदेखील खेळतो.

डॉक्टर : किती वेळ खेळता?

पेशंट : मोबाइलची बॅटरी संपेपर्यंत.

१०

सक्षम बनू या:-

१)विनोदाचे वाचन करताना कोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात याबद्दल शिक्षकांनी मुलांना सहज व सोपे स्पष्टीकरण द्यावे.

उदा. अ) विनोदामध्ये दोन किंवा जास्त व्यक्ती असू शकतात.

ब)विनोदांमध्ये एक आशय दडलेला असतो, ज्यामुळे विनोदबुद्धी जागृत होते.

क)विनोदाचे योग्य पद्धतीने वाचन केले तरच ऐकणाऱ्याला विनोद समजतो .

२)मुलांची विनोदाची संकल्पना दृढ होण्याच्या दृष्टीने मुलांना वेगवेगळे विनोद आदर्श पद्धतीने व हावभावासहित वाचून दाखवावे.

सराव करू या :-

१)आपल्या वर्गातल्या मुलांसाठी त्यांचे वय व आकलनास योग्य अशा विनोदाची निवड करावी.

२)विविध प्रकारच्या विनोदाचे मुलांना प्रकट वाचन करण्यास सांगावे व विनोद निर्मितीस वाव द्यावा.

३)मुलांमध्ये विनोदबुद्धी जागृत करण्याचा प्रयत्न करावा.

४)एखाद्या विनोदाचे नाट्यीकरण करून घ्यावे.

५)वर्तमानपत्रातील विनोदाचा संग्रह करण्यास प्रोत्साहन द्यावे.

इयत्ता :- ६ वी


क्षेत्र : - संभाषण / वाचन

कौशल्य / कृती : - भाषिक खेळ दिवस : - अठरावा

अध्ययन निष्पत्ती- 5.16.03,5.16.06/6.16.09

जाणून घेऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शब्दकोडी विचारून विद्यार्थी अचूक उत्तरे सांगतात का ते जाणून घ्यावे. उदा.




सक्षम बनू या

•शिक्षकांनी भाषा समृद्धीसाठी विविध भाषिक खेळांचे अनुभव विद्यार्थ्यांना द्यावेत.

जसे- चित्ररूप शब्दकोडी, शाब्दिककोडी, सोंगट्याचा खेळ इ.


•शिक्षकांनी पुढे दिलेले भाषिक खेळ विद्यार्थ्यांना खेळण्यास सांगावेत.

सोंगटी टाका. पुढे चला.



शिक्षकांसाठी : खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना सांगावे. 'अ' या चौकोनापासून सुरुवात करावी. कॅरमची एक सोंगटी घ्यावी. तिच्या एका बाजूला लाल व दुसऱ्या बाजूला हिरवा रंग द्यावा. खेळताना सोंगटीची लाल रंगाची बाजू पडली, तर एक घर पुढे जावे. सोंगटीची हिरव्या रंगाची बाजू पडली, तर दोन घरे पुढे जावे. प्रत्येक घरात एक अक्षर लिहिले आहे. ज्या घरात तुमची सोंगटी असेल, त्या घरातील अक्षर वाचावे. त्या अक्षराचा शब्द सांगावा. (शब्द सांगण्यासाठी उदाहरणादाखल काही चित्रे दिलेली आहेत.) सोंगटीची लाल रंगाची बाजू पडल्यास दोन शब्द सांगावे. सोंगटीच्या हिरव्या रंगाची बाजू पडल्यास एक शब्द सांगावा. ज्या खेळाडूला शब्द सांगता येणार नाही, त्याची संधी जाईल. जो सर्वांत आधी 'ज्ञ' अक्षराबर पोहचेल तो जिंकेल. हा खेळ गटागटांत घ्यावा. प्रत्येक गटाला एक-एक सोंगटी द्यावी. विद्यार्थ्यांना पुस्तकातील हे पृष्ठ उघडून खेळण्यास सांगावे.

(अं, ऑ, अः, ड, ञ, ण, ळ या अक्षरांपासून सुरू होणारे शब्द मराठी भाषेत नाहीत, म्हणून वरील खेळात ही अक्षरे घेतलेली नाहीत.)



शिक्षकांसाठी : खेळ कसा खेळावा हे विद्यार्थ्यांना सांगावे. एक या घरापासून खेळ खेळायला सुरुवात करावी. कॅरमची एक सोंगटी घ्यावी. सोंगटीच्या एका बाजूला लाल रंग, तर दुसऱ्या बाजूला हिरवा रंग द्यावा. लाल रंग पडला तर एक घर पुढे जावे. हिरवा रंग पडला तर दोन घरे पुढे जावे. खेळता खेळता शिडी आली, तर ती चढताना दोन्ही घरातील संदेश वाचावा. शिडीने वर गेल्यास बक्षीस मिळेल. सापाचे तोंड असलेल्या घरात आल्यास तेथील मजकूर वाचावा व त्याच्या शेपटी असलेल्या घरात यावे. याप्रमाणे जो शेवटच्या घरात लवकर पोहचेल तो विजयी. गटागटांत हा खेळ घ्यावा. प्रत्येक गटाला एक-एक सोंगटी द्यावी. पुस्तकातील हे पृष्ठ उघडून खेळण्यास सांगावे.

का	स	व	वा	य	ड	पा	गे
री	ला	न्ड	गा	ग	ह	न्डा	फ
झे	ब्रा	पा	चि	वा	का	ण	रा
क	पा	ण	ह	त्ती	प	अ	ह
ड	सा	घो	ल	ली	वी	स्व	बै
मु	धो	डा	जि	को	ट	ल	पा
न्यु	ळा	व	रा	ल्हा	घो	उ	न्ह
स	सा	स	फ	सा	बो	का	जि
का	व	न्व	खा	मा	क	ड	न्गु
ळ	सा	चि	र	का	ड	न्डा	ळ



वरील चौकटीतील प्राण्यांची नावे शोधा. चित्ररूप कोडे सोडवा.

सोंगटी टाका. पुढे चला.

सराव करू या.

•विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक, किशोर मासिके, वर्तमानपत्रे, बालमित्र साप्ताहिकअंक इ. मध्ये असणारी विविध शाब्दिक खेळ, कोडी शोधावीत. गटात ,जोडीने, वैयक्तिकरित्या भाषिक खेळ खेळावेत. कोडी सोडवावी. आवश्यक तेथे पालकांची मदत घ्यावी.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - प्रश्नचिन्हाचा लेखनात वापर **दिवस : - एकोणिसावा**

अध्ययन निष्पत्ती-
पाचवी:-05.16.09 आणि 05.16.10 सहावी:-06.16.05

जाणून घेऊ या

अ)शिक्षकांनी फळ्यावर पुढील वाक्ये लिहावीत .विद्यार्थ्यांना प्रश्नार्थक (प्रश्न चिन्हांचा वापर असलेली) वाक्यांचे क्रमांक लिहायला सांगावेत.

1)काल पाऊस पडला?
2)जंगलाला आग लागली तेव्हा तो जंगलात होता.
3) तू बाजारात गेला होता.
4) मैनाला गणित विषय आवडतो?
5)जंगलाला आग लागली तेव्हा तो जंगलात होता?
6)तू बाजारात गेला होता?
7)काल पाऊस पडला.
8) मैनाला गणित विषय आवडतो.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरांवरून विद्यार्थ्यांना प्रश्नचिन्हांच्या वापराबाबत कितपत माहिती आहे हे जाणून घ्यावे.

शिक्षक विद्यार्थ्यांना पुढील प्रसंगात ते कोणते वाक्य म्हणतील. ते वाक्य लिहायला सांगतील. लिहिताना योग्य विरामचिन्हाचा वापर करण्यास विद्यार्थ्यांना सांगावे।

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील प्रसंग देऊन प्रत्येक प्रसंगावर एक वाक्य योग्य त्या विरामचिन्हासह लिहायला सांगावे.

1)तुमच्या मित्र/मैत्रिणीकडे घड्याळ आहे तुम्हाला त्याला/तिला वेळ विचारायची आहे यासाठी तू कोणते वाक्य म्हणशील ते लिही.
2) तुझ्या मित्राकडे दोन पेन आहेत त्यापैकी एक पेन तुला घ्यायचा/मागायचा आहे. तू त्याला कोणते वाक्य म्हणशील ते लिही.
3)तुझ्या मित्र – मैत्रिणीचा सर्वात आवडता पदार्थ तुम्हाला माहिती करून घ्यायाचा आहे तो पदार्थ माहीत करून घेण्यासाठी तुम्ही त्याला कोणते वाक्य म्हणाल ते लिहा

शिक्षक विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरांवरून विद्यार्थ्यांना प्रश्नचिन्हाच्या वापराबाबत कितपत माहिती आहे हे जाणून घेतील.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न चिन्हाचा वापर वाक्यात केव्हा व कुठे होतो याबाबत पुढीलप्रमाणे माहिती सांगावी व उदाहरणे द्यावीत.

1एखाद्या व्यक्तीला काही विचारायचे असेल तर त्या वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह येते.
(उदा.तुझ्याकडे किती पेन आहेत? ,विहिरीला पाणी लागले का?)
2)मुलाखत घेताना मुलाखत घेणारा हा मुलाखत देणाऱ्याला प्रश्न विचारत असतो.

(तुम्ही कोणकोणती पुस्तके आत्तापर्यंत वाचलीत? तुम्हाला सर्वाधिक आवडलेले पुस्तक कोणते? तुमचे आवडते लेखक कोणते?)

3)समोरच्या व्यक्तीकडे काही मागायचे असेल तर त्या व्यक्तीला आपण जे विचारतो तेव्हाही प्रश्नचिन्हाचा वापर केला जातो .

(मला तुझ्याकडील पुस्तक वाचण्यासाठी देशील का?)

4)परवानगी मागणाऱ्या वाक्यांमध्ये प्रश्नचिन्ह येते.

(उदा. साहेब मी आज ऑफिसमधून लवकर घरी जाऊ का ?)

5) लिहित असलेल्या माहितीमध्ये माहिती बद्दल लिहिणाऱ्यालाच खात्री नसते किंवा पुरेसे ठोस पुरावे लिहिणाऱ्याला मिळालेले नसतात तेव्हा प्रश्नचिन्हयाचा वापर केला जातो.

उदाहणार्थ

अ)किशोर मासिकाच्या 1987 (?) सालच्या एका अंकातही गोष्ट प्रसिद्ध झालेली होती.

ब)आजोबांनी वयाच्या सहाव्या वर्षी(?)तबल्याचे शिक्षण त्यांच्या गुरुजींकडे घ्यायला सुरुवात केली होती.

6) काही वेळा प्रश्नचिन्हाचा वापर काही शातिरकसपणे उपहासानेही केला जातो.

उदाहरणार्थ

अ)अनेक सुशिक्षित (?) लोक हे अंधश्रद्धा पाळतात.

(थोडक्यात या लोकांना सुशिक्षित म्हणावे का असा प्रश्न लेखकाला पडला आहे.)

सराव करू या

शिक्षकांनी पुढील उतारा फळ्यावर लिहावा आणि विद्यार्थ्यांना योग्य विरामचिन्हांचा वापर करून तो उतारा पुन्हा लिहावयास सांगावा.

राम व संदीप वर्गात शेजारीशेजारी बसत होते एकदा रामकडे पेन नव्हता रामने संदीपला विचारले संदीप तुझ्याकडे किती पेन आहेत संदीप म्हणाला माझ्याकडे दोन पेन आहेत राम संदीपला म्हणाला मला एक पेन देतोस का संदीप रामला म्हणाला तुझा पेन कुठे गेला राम म्हणाला माझा पेन आज घरी विसरला.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - स्वल्प विरामांचा लेखनात वापर **दिवस : - विसावा**

अध्ययन निष्पत्ती-

पाचवी:-05.16.09 आणि 05.16.10सहावी:-06.16.05

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वल्पविराम असलेली पुढील वाक्ये सांगून ती लक्षपूर्वक ऐकायला सांगावीत. वाक्य सांगताना विरामचिन्हांचा प्रभावी वापर होईल अशाप्रकारे सांगवीत पुढीलप्रमाणे सूचना द्याव्यात.

(वाक्ये ऐकून लिहा. योग्य त्या ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करा.)

1)विठाईच्या कंपासपेटीत एक पेन, दोन पेन्सिली, एक रबर, एक पट्टी आणि एक कर्कटक आहे.

2)इंद्रनील सासवडच्या आठवडे बाजारात गेला.त्याने बाजारातून भेंडी,कारली ,दोडके ,मिरच्या, आले, बटाटा, कांदे घेतले व पिशवीत भरून तो घराकडे निघाला.

3 हैबती जंगलात गेला. जंगलातून त्याने करवंदे,चिंचा, बोरे,जांभळे, आंबे आणले.

वरील तिन्ही वाक्ये विद्यार्थ्यांकडून लिहून घ्यावीत.विद्यार्थ्यांनी लिहिलेली वाक्ये वाचावीतव विद्यार्थ्यांनी योग्य ठिकाणी स्वल्पविराम व इतर विरामचिन्हांचा वापर केला आहे की नाही हे पाहावे. यावरून स्वल्पविरामाबद्दल विद्यार्थ्यांची कितपत जाण आहे हे जाणून घ्यावी

सक्षम होवू या

शिक्षकांनी स्वल्पविराम या विरामचिन्हाचा वापर लेखनात केव्हा होतो हे विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे सांगावे.

अ)एकाच वाक्यात एकाच प्रकारचे शब्द ,वाक्यांचे लहान तुकडे वगैरे एकापाठोपाठ एक यादी केल्यासारखे आले तर ते एकमेकांपासून वेगळे दाखविण्यासाठी स्वल्पविरामाचा वापर होतो.

उदाहरणार्थ:-

रहीमच्या पिशवीत मोबाईल, बॅट,कॅमेरा व पुस्तके आहेत.(या वाक्यात वस्तूंच्या नावांची म्हणजे नावांची यादी आहे व दोन वस्तूंच्या नावांमध्ये स्वल्पविराम या चिन्हाचा वापरकेल्यामुळे विविध वस्तूंच्या नावांचा उल्लेख स्पष्टपणे जाणवत आहे.)

ब)वाक्यातील अशा यादी असलेल्या शेवटच्या शब्दानंतर स्वल्पविराम देत नाहीत कारण तिथे थांबण्याची गरज नसते.

क) अशा यादीत दोन पेक्षा अधिक शब्द असतील तरच स्वल्पविरामांचा वापर केला जातो. दोनच शब्द असल्यास 'आणि' किंवा 'व' अशा उभयान्वयी म्हणजे दोन शब्द किंवा वाक्य जोडणाऱ्या अव्ययांनी काम भागते.

ड) यादी संपल्याचे लक्षात यावे म्हणून शेवटचे दोन शब्द स्वल्पविरामाऐवजी 'आणि' किंवा 'व' वापरून वेगळे दाखवले जातात.

इ)खूप मोठे वाक्य असेल व त्या वाक्यात दोन क्रिया दर्शवणारी क्रियापदे असतील तर पहिल्या क्रियेच्या वाक्यानंतर स्वल्पविराम वापरला जातो. व दुसऱ्या वाक्यानंतर मग पूर्णविराम दिला जातो.(स्वराजने बाजारात जाऊन आंबे आणले, ते आईला आमरस करण्यासाठी स्वयंपाक घरात जाऊन दिले).

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - प्रकटवाचन दिवस : - एकविसावा

अध्ययन निष्पत्ती१-) ५.१६.०६२)६.१६.१४

जाणून घेऊ या:-

१) दिलेल्या उताऱ्याचे मुलांकडून प्रकटवाचन करून घ्यावे.

२)प्रकटवाचन घेताना आवाजातील चढउतार-, चेहऱ्यावरील हावभाव, योग्य ठिकाणी थांबे, विरामचिन्हांचा वापर करून वाचन होते का हे निरीक्षण करावे.

(नमुनाउतारा इयत्ता- पाचवी सुलभभारती पृष्ठ क्र. ६)

टीप:-प्रकटवाचन सुरू असताना शिक्षकांनी मुलांच्या त्रुटी जाणून घ्याव्यात.

बदकाला मिनूचे कौतुक वाटले. बदक मिनूला म्हणाले, "मिनू, तू माझी पिसं देण्यासाठी इतक्या दूर आलीस, म्हणून ही पिसं तुझ्याजवळच ठेव. एकदा पिसं गळून पडली, की ती पुन्हा जोडली जात नाहीत. तुला अशीच वेगवेगळी पिसं सापडली तर ती तू सांभाळून ठेव."

मिनू आनंदाने घरी आली. तिने बदकाने दिलेली पिसे आपल्या वहीत ठेवली.



सक्षम बनू या:-

१)मुलांना उताऱ्याचे आदर्श पद्धतीने प्रकटवाचन करून दाखवावे.

२) विशिष्ट शब्दावर आधारित आघात देणे, विशिष्ट ठिकाणी शब्द तोडणे, योग्य वेळी थांबे.. इत्यादी बाबत मुलांना सोदाहरण स्पष्टीकरण द्यावे.

सराव करू या:-

१) सुरुवातीला प्रत्येक विरामचिन्हांचा स्वतंत्र सराव द्यावा.

२)योग्य उतारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावेत व त्यांच्याकडून प्रकटवाचनाचा सराव करून घ्यावा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - भाषाभ्यास
कौशल्य / कृती : - लिंग **दिवस : - बाविसावा**

अध्ययन निष्पत्ती :

05.16.05.16.09, 05-16-11, 06.16.20,06-16-20

जाणून घेऊ या :

• परिचित शब्द फळ्यावर लिहून विद्यार्थ्यांना ते वाचायला त्यांचे लिंग ओळखायला प्रवृत्त करावे.

जसे- गाय, बैल, फळा, कुत्रा, वही, मोर,पुस्तक, घर

• एकाच नामाची पुल्लिंगी व स्त्रीलिंगे रूपे कशी होतात हे विद्यार्थ्यांना खालील उदाहरणांच्या आधारे स्पष्ट करून सांगावे.

पुल्लिंग	स्त्रीलिंग
बैल	गाय
राजा	राणी
पती	पत्नी
देव	देवी

पुल्लिंग	स्त्रीलिंग
वाघ	वाघीण
नवरा	बायको
सासरा	सासू
शिक्षक	शिक्षिका

सक्षम बनु या :

विद्यार्थ्यांना पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी शब्द देऊन संबंधित भिन्नलिंगी शब्द सांगण्यास प्रवृत्त करावे.

पुल्लिंग	पिता		पुरुष		वडील		मोर	
स्त्रीलिंग		बहीण		कन्या		सांडणी		लेखिका

पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग म्हणजे काय हे विद्यार्थ्यांना पुन्हास्पष्ट करून सांगावे. लिंग कसे ओळखावे याबाबत चर्चा करावी.

चला सराव करुया :

●पुल्लिंगी व स्त्रीलिंगी नामांचे वर दिलेले तक्ते तुमच्या वहीत लिहा

●खाली दिलेल्या शब्दांची पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंगयानुसार गटवारी करून लिहा.

आंबा, वासरू, चंद्र, पपई, राग, वृक्ष, झाउ, मूल, चांदणी.

●खालील वाक्यातील अधोरेखित नामाचे लिंग ओळखून लिहा.

१) स्वरालीने सुंदर फूल आणले.

2) ही बातमी गावभर पसरली.

3) शाळेच्या वाटेवर ओढा होता.

४) तुषारला रानात मेंढरू दिसले.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - भाषाभ्यास
कौशल्य / कृती : - जोडशब्द **दिवस : - तेविसावा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.२०

जाणून घेऊ या :

१)शिक्षक विद्यार्थ्यांसमोर काही शब्दांचे फळ्यावर लेखन करतील

२)त्या शब्दांचे वाचन करून घेतील .

३)एकाच शब्दात दोन शब्द कसे जोडून आलेले आहेत ते समजावतील .

जसे – घरदार , ओढाताण , उरलासुरला , ऐषआराम

अधिक शब्द घेऊन मुलांचा सराव घ्यावा .

सक्षम बनु या :

खालील प्रमाणे शिक्षकांनी जोडशब्दाचा सराव घ्यावा .

खाली दिलेल्या शब्दात कोणते जोडशब्द आलेले आहेत .

१)उद्योगधंदा – ----------

२)उपासतापास – ----------


३)ओढूनताणून – ----------

४)कडेकपारी – ----------

५)आगळावेगळा – ----------

चला सराव करु या :

दोन फुलावरील योग्य दोन शब्द एकत्र करून जोडशब्द तयार करा व लिहा . (इयत्ता ५ वी पान क्रमांक ५५ वरील चित्र)



जसे गोरगरीब तसे

१) ----------

२) ----------

३) ----------

४) ----------

५) ----------

६) ----------

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - अनुलेखन **दिवस : - चोविसावा**

अध्ययन निष्पत्ती :

-05-16-08, 05-16-09, 05-16-10,06.16.05, 06-16-16, 06-16-17,06-16-20

जाणून घेऊ या :

विद्यार्थ्यांना खालील परिच्छेद सुवाच्य अक्षरात वहीत लिहिण्यास सांगावे.

विठ्ठल रामजी ऊर्फ अण्णासाहेब शिंदे यांचा जन्म जमखंडी गावी झाला. अण्णासाहेबांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव यमुनाबाई होते. लहानग्या विठ्ठलाला खेळाची अत्यंतआवड होती. हुतूतू, खो-खो, सुरपारंब्या यांसारखे खेळ खेळण्यातविठ्ठल सदैव पुढे असे. लहानपणीच्या या खेळांमध्ये विठ्यलचा धीटपणा व सहनशीलता दिसून येई. त्याचे वडील धार्मिक वृत्तीचे होते.त्यांच्या धार्मिक वृत्तीचा विठ्ठलवरही परिणाम झाला होता. सर्व जातिधर्माचे लोक त्यांच्या घरी येत असत. माणसामाणसात भेद करणे योग्य नाही, याचा संस्कार घरातील वातावरणामुळे लहानग्या विठ्ठलच्या मनावर उमटला.

विद्यार्थ्यांनी अचूक लेखन केले आहे का, हे तपासून त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करावे.

सक्षम बनु या :

अनुलेखनासंबंधी विद्यार्थ्यांना नीटनेटके लेखन,सुवाच्य आणि वळणदार अक्षर, दोन अक्षरे व दोन शब्दांमधील अंतर, विरामचिन्हांचा अचूक वापर, योग्य गतीने लेखन करणे इ.मुद्यांआधारे मार्गदर्शन करावे.

अण्णा, विठ्ठल, धार्मिक, महर्षी, आशा, भाषा, विषय,सुट्टी, लढ, जिद्द, नऊ, नववा, तीन, तिसरा, गप्पा, गल्ली, सीमा,दीपक, सूर्य, आशीर्वाद, पत्ता, वृत्ती हे शब्द असेच लिहावेतयाची विद्यार्थ्यांना जाणीव करून देऊन ते वहीत लिहिण्यास सांगावे.

चला सराव करु या :

पाठ्यपुस्तकातील प्रतिज्ञा किंवा राष्ट्रगीत किंवा भारताचे संविधान आणि पहिल्या कवितेचे अनुलेखन करा.

वरील अनुलेखन तपासून त्यात काही शब्द जर चुकले असतील तर त्यांचे अचूक अनुलेखन करावे.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - श्रवण
कौशल्य / कृती : - गोष्ट **दिवस : - पंचविसावा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.२

जाणून घेऊ या :

१)शिक्षकांनी मुलाना हावभावयुक्त योग्य आवाजातील चढउतारासह गोष्ट सांगावी.

२)गोष्ट सांगताना मुलांना मध्ये मध्ये लहान लहान प्रश्न विचारावेत .

यासाठी छान छान गोष्टी , गमतीदार गोष्टी , इसापनीती ई. यासारख्या पुस्तकातील गोष्टी सांगाव्यात .

सक्षम बनु या :



चित्र दाखवून गोष्ट सांगावी .

गोष्टीवर आधारित तर्क करणारे प्रश्न विचारावेत.

चित्रावर वैचारिक प्रश्न विचारावेत.

चला सराव करु या :

चित्ररूप गोष्टीच्या पुस्तकातून मुलाना चित्राद्वारे गोष्ट वाचन करून दाखवावी .

चित्रावर प्रश्न विचारावेत.

मुखपृष्ठ , मलपृष्ठ व पुस्तकाच्या अंतरंगांची ओळख द्यावी.

गोष्टीवर विचारप्रवर्तक प्रश्न विचारावेत.

उदा. पुढे काय झाले असेल ?

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - संभाषण / वाचन
कौशल्य / कृती : - गोष्ट सांगणे , अपूर्ण गोष्ट पूर्ण करणे दिवस : - सव्विसावा

अध्ययन निष्पत्ती-5.16.01, 5.16.03, 5.16.06, 5.16.14/6.16.02

जाणून घेऊ या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिचित विषयावर आधारित गोष्ट ऐकवावी. त्यावर आधारित काही प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना गोष्ट समजली हे शिक्षकांनी जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील एक गोष्ट वाचून दाखवावी. गोष्ट वाचताना आवाजातील चढउतार, हावभाव, स्पष्ट अचूक उच्चारासह, विरामचिन्हे लक्षात घेऊन गोष्टीचे वाचन करावे इ. बाबी विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्याव्यात.
• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गोष्टींवर आधारित आकलनावर, मुक्तोत्तरी प्रश्न विचारावेत. तसेच घटनाक्रम व पात्रांच्या संदर्भात प्रश्न विचारावेत.
• शिक्षकांनी गोष्टींचा तास आयोजित करून विद्यार्थ्यांना गोष्टी सांगण्याची संधी द्यावी.
• एखादी अपूर्ण गोष्ट देऊन गोष्टीत पुढे काय घडले असेल यावर बोलण्याची संधी द्यावी.

सराव करू या

•विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक तसेच पाठ्यपुस्तकेतर साहित्यातील जसे -किशोरमासिके, बालमित्र साप्ताहिक,इ - पुस्तके,पूरकवाचनाची पुस्तके इ . मधील उपलब्ध गोष्टी काळजीपूर्वक वाचाव्यात आंतरजाल यावर उपलब्ध तसेच विविध संकेत स्थळावर असलेल्या गोष्टी शोधून वाचाव्यात .
• गोष्टीतील आवडती पात्रे, चित्रे,घटना याविषयी मित्रांशी चर्चा करावी.
•आवडलेल्या गोष्टी आपल्या घरातील व्यक्ती, मित्रांना सांगाव्यात.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - जाहिरात वाचन दिवस : - सत्ताविसावा

अध्ययन निष्पत्ती :- १) ५.१६.०६२) ६.१६.१०

जाणून घेऊ या :-

१) शिक्षकांनी खाली दिलेल्या 'जाहिरात' नमुन्याच्या मदतीने विद्यार्थ्यांकडून जाहिरातीचे वाचन करून घ्यावे आणि त्यावर विद्यार्थ्यांशी चर्चा करावी.

२) शिक्षकांनी जाहिरातीवर आधारित प्रश्नोत्तरे घ्यावीत. उदा. जाहिरात कशाची आहे? व्यायाम शाळा कोठे आहे? व्यायाम शाळेची वेळ काय आहे? यावरून विद्यार्थ्यांचा प्रतिसाद जाणून घ्यावा.


'आरोग्यम् धनसम्पदा'

वाळके शक्ती व्यायामशाळा

प्रो. विशाल वाळके यांची व्यायामशाळा
योगासने व व्यायाम हीच आरोग्याची गुरुकिल्ली

वेळ
सकाळी ५ ते १०
सायं ५ ते ९

आमची वैशिष्ट्ये
* वातानुकूलित प्रशस्त जागा
* सोईस्कर वेळा
* आधुनिक सामग्री
* तज्ज्ञ प्रशिक्षक

संपर्क पत्ता - वाळके शक्ती व्यायामशाळा,
'प्राजक्त' हिल टॉप रोड, अमरावती १४.

सक्षम बनू या :-

१)जाहिरात ही संकल्पना समजण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना माहिती द्यावी. विद्यार्थ्यांकडून याबाबतचा प्रतिसाद घ्यावा.

२.)शिक्षकांनी विविध प्रकारच्या जाहिराती चे नमुने विद्यार्थ्यांना दाखवावेत व जाहिरात संकल्पनेचे दृढीकरण करून घ्यावे

३)विद्यार्थ्यांना शाळेत होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे, क्रीडास्पर्धेची जाहिरात बनवायला सांगणे.

सराव करू या :-

१) शिक्षकांनी वर्तमानपत्रे, मासिके यातून मिळणाऱ्या जाहिरातीचे नमुने विद्यार्थ्यांना देऊन त्यावरून खालील कृती करून घ्याव्यात.

अ)जाहिरातीचे वर्गीकरण,ब) जाहिरात जाहिरातीतील माहितीचे वाचन व आकलन

क) मुलांचे गट तयार करून जाहिराती वर आधारित प्रश्नोत्तरे.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - चित्रावरून गोष्ट लिहिणे दिवस : - अठ्ठाविसावा

अध्ययन निष्पत्ती-

पाचवी:-05.16.08 आणि 05.16.10सहावी:-06.16.18

जाणून घेऊ या

शिक्षकांनी पुढील चित्रांचे निरीक्षण विद्यार्थ्यांना करायला सांगावे व चित्रांच्या आधारे गोष्ट लिहिण्यास सांगावी.

पुढील सूचना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना द्यावी (चित्रे पहा व चित्रांच्या आधारे गोष्ट लिहा.)



शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेली गोष्ट वाचावी व चित्रांच्या आधारे,चित्रांचे निरीक्षण करून, त्यात घडलेली घटना ओळखून तसेच चित्रांच्या वर्णनासाठी वाक्ये तयार करून ,विद्यार्थ्यांना घटनाक्रमद्वारे गोष्ट लिहिता येते की नाही हे पाहावे.

सक्षम बनू या

शिक्षक विद्यार्थ्यांना चित्रांच्या सहाय्याने गोष्ट कशी तयार करायची याबद्दल मार्गदर्शन करतील.

1)सुरुवातीला चित्रांचे बारकाईने निरीक्षण करावे.

2)पहिल्या चित्रापासून शेवटच्या चित्राचे क्रमाने निरीक्षण करत जावे.

3)क्रमाने निरीक्षण केल्यानंतर काय घटना घडली असेल? याचा बारकाईने विचार करावा.

4)काय घटना घडली? हे निश्चित झाल्यानंतर पहिल्या चित्राकडे जावे व बारकाईने निरीक्षण करावे.

5) प्रत्येक चित्राचे दोन ते तीन वाक्यांमध्ये वर्णन लिहावे.

6)चित्रांचे वर्णन करत असताना चित्रामध्ये काय दिसत आहे व चित्रामागे काय आहे हेही बारकाईने जाणून घेऊन वर्णन लिहावे.


7)चित्रात व्यक्ती,प्राणी,मुले दिसत असतील तर त्यांना तुमच्या आवडीची नावे द्यावीत.

8)गोष्ट प्रभावी होण्यासाठी काही संवादात्मक वाक्ये समाविष्ट करावीत व योग्य विरामाचिन्हे वापरावी.

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील चित्रे दाखवावीत व चित्रांच्या आधारे गोष्ट लिहिण्यास सांगावी. पुढीलप्रमाणे सूचना विद्यार्थ्यांना द्यावी.

(पुढे दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करा व आत्ता सांगितलेल्या सूचनांप्रमाणे चित्रांच्या आधारे गोष्ट तयार करून ती लिहा. गोष्टीला नाव द्या.



इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - संभाषण / लेखन
कौशल्य / कृती : - अनुभव कथन दिवस : - एकोणतिसावा

अध्ययन निष्पत्ती-5.16.12,5.16.13,5.16/6.16.01,6.16.02,6.16.04

जाणून घेऊ या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिचित विषय देऊन आपले अनुभव कथन करण्यास सांगतात.
जसे- पावसाळा, कोरोना काळातील आलेले चांगले वाईट अनुभव, ऑनलाईन शाळाइ.
• विद्यार्थी आपले अनुभव कशाप्रकारे सादर करतात हे शिक्षकांनी जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढे दिलेले अनुभव तक्ते वाचून दाखवावेत.



एक लहान मुलगी हरवली होती. ती रस्त्याने जात होती. तिकडून एक मोठा ट्रक येत होता. ती ट्रकच्या खाली जात होती. तिला काही कळत नव्हते. मी धावत तिच्याजवळ गेलो तिला रस्त्यापलीकडे आणले. ती खूप घाबरली होती. मी तिच्या कानात फुंकलो. मग मी माझ्या घरून पाणी आणले व तिला दिले. तिने ते पाणी प्यायले, मग मी तिच्या आईला शोधायला गेलो. तिची आई सापडल्यावर ती धावत तिच्या आईच्या गळ्यात जाऊन पडली. तिच्या आईने मला शाबासकी दिली. ही गोष्ट मी माझ्या वर्ग शिक्षकांना सांगितली. त्यांनीपण मला शाबासकी दिली. मला पण खूप खूप आनंद झाला.

कु. तन्मय युवराज माने
जि. प. प्रा. शाळा पारडी,
ता. सेलू, जि. परभणी ४३१५०३.



एकदा शाळा सुटताना आमच्या वर्गातली लाईट चालू होती. सरांच्या लक्षात नव्हतं. मग मी सरांना विचारले, ''आपल्या वर्गातली लाईट चालू आहे ती मी बंद करू का?'' सरांनी 'हो' म्हणून सांगितले. मग मी लाईट बंद केली. मग मी वर्गातून बाहेर आलो तेव्हा सरांनी मला शाबासकी दिली. माझं कौतुक केलं हे बघून सर्व मुलांना आनंद झाला. मग दररोज शाळा सुटताना सगळी मुलं लाईट बंद आहे की नाही ते बघायला लागले. यामुळे आमच्या शाळेच्या विजेची बचत व्हायला लागली.

कु. ध्रुमिल विलास चव्हाण
जि.प.प्रा.शाळा चौके मांडखोल,
मु.मांडखोलवाडी, पो. चौके,
ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग ४१६६०५.

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आलेले अनुभव कथन करण्याची संधी द्यावी.
• विद्यार्थ्यांनी सांगितलेल्या अनुभवांवर चर्चा घडवून आणावी .त्यांना आपले विचार, मत मांडण्याची संधी द्यावी.
• विद्यार्थ्यांना आपले अनुभव कागदावर लिहून नावासह वर्गात लावावेत. नंतर शिक्षकांकडे जमा करावीत.
• शिक्षकांनी यातील निवडक चांगले अनुभव तक्ते वर्गाच्या हस्तलिखितात समाविष्ट करावेत.

सराव करू या

• विद्यार्थ्यांनी आपल्याला दररोज येणारे अनुभव वहीत लिहीत राहावे.
• आपले अनुभव आपले मित्र-मैत्रिणी, आपल्या घरातील व्यक्ती, शिक्षक यांना सांगावेत.
• विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक, किशोर मासिके, बालसाहित्य इ.मध्ये आलेले अनुभवपर लेखन वाचावेत. आवडलेले अनुभव मित्रमैत्रिणींना सांगावेत.

इयत्ता :- ६ वी

क्षेत्र : - श्रवण / भाषण संभाषण / वाचन / लेखन

कौशल्य / कृती : - चाचणी क्रमांक – २ गुण – १५ दिवस : - तिसावा

प्रश्न १ ला)खालील उतारा वाचा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा . ४ गुण

मी आहे नदी . माझा जन्म पर्वतावर होतो . मला अनेक ओढे येऊन भेटतात . त्या ओढ्यामुळे मी मोठी होत जाते . इतर नद्याही मला येऊन भेटतात . माणसे धरण बांधून मला अडवतात. माझ्या पाण्यावर वीज तयार करतात. त्या विजेवर कारखाने चालवतात . शेतातील पंप चालवतात . पिण्यासाठी पाण्याचा वापर करतात.

१)नदीचा जन्म कुठे होतो ?

---

२)नदी कोणामुळे मोठी होते ?

---

३) माणसे नदीला कशी अडवतात ?

---

४)नदीच्या पाण्याचे उपयोग लिहा ?

प्रश्न २ रा) पावसाळ्यातील तुमचा अनुभव सांगा. ३ गुण

प्रश्न ३ रा) खालील वाक्यातील नाम ओळखा . २ गुण

१)आज मी आंबा खाल्ला . ----------

२)राम हुशार मुलगा आहे . ----------

प्रश्न ४ था) खालील वाक्यातील अधोरेखित नामाचे लिंग ओळखा . २ गुण

१)<u>कावळा</u> झाडावर राहतो . ----------

२) मायाने <u>दार</u> उघडले . ----------

प्रश्न ५ वा) खालील वाक्यात योग्य विरामचिन्ह घाला . २ गुण

१)तू आज शाळेत गेला होता का

२) मला आंबा केळे फणस आवडते

प्रश्न ६ वा) जसे गोरगरीब यासारखे दोन जोडशब्द लिहा . २ गुण

१)---------- २) ----------

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - कविता वाचन दिवस : - एकतिसावा


अध्ययन निष्पत्ती–

१) ५.१६.०१२) ६.१६.०९

जाणून घेऊ या -

१)नमुना म्हणून शिक्षकांनी इयत्ता पाचवीच्या पाठ्यपुस्तकातील एक कविता विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी.(सुलभभारती इयत्ता-पाचवी पृष्ठ क्रमांक.१४)

२) शिक्षकांनी मुलांच्या कविता वाचनातल्या लकबीचे निरीक्षण करावे काही त्रुटी शिक्षकांच्या सहज लक्षात येतील जसे गद्य स्वरूपात वाचन करणे, वाचनात लयबद्धता नसणे, एकसुरी पद्धतीचे वाचन करणे... इत्यादी.



१०. बैलपोळा

• ऐका. वाचा.

सण बैलांचा
आज पोळा,
गोठ्यातील बैल
न्हाऊ घाला.

मखमली झुली,
रंगीत शिंगे,
कपाळी बांधली
रेशमी बाशिंगे.

ढवळ्या-पवळ्या
सजलेधजले.
गावभर बघा
मिरवू लागले.

आजच्या दिनी
नाही कामधाम,
पुरणपोळी खाऊन
नुसता आराम.

– धोंडीरामसिंह राजपूत

सक्षम बनू या :-

१)विद्यार्थ्यांच्या कविता वाचनातील त्रुटी लक्षात घेऊन शिक्षकांनी आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन करावे. उदाहरणार्थ. पाठ वाचन आणि कविता वाचन यामधील फरक लक्षात आणून देणे.

२)कविता वाचन करताना तालबद्धता, लयबद्धता असावी हे समजावून सांगणे. कवितेमधील यमक जुळणारे शब्द त्यांच्या लक्षात आणून देणे.

३)कवितेतील नवीन शब्दाचे अर्थ त्याचे वेगळेपण समजावून देणे.

टीप:- शिक्षक विद्यार्थ्यांचे भावविश्व ओळखून कवितेची निवड करू शकतात.

सराव करू या :-

१)विद्यार्थ्यांना वाचन करण्यासाठी वेगवेगळ्या कविता उपलब्ध करून द्याव्यात.

२) कविता वाचन करताना विद्यार्थ्यांना कोठे अडचण येत असेल तेथे मदत करावी.

(उदाहरणार्थ.आवाजातील चढ-उतार कोणते, शब्द सावकाश वाचायचे कोणते पटकन.. इत्यादी)

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - बातमी वाचन दिवस : - बत्तीसावा

अध्ययन निष्पत्ती१-) ५.१६.०४२) ५.१६.०६३) ६.१६.०३

जाणून घेऊ या :-

कृती १) शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खालील बातमी वाचायला द्यावी .

कृती२) वर्तमानपत्रातील बातमी प्रकट वाचन करताना विद्यार्थ्याचे हावभाव वाचनातील बारकावे विरामचिन्हे इत्यादींचे निरीक्षण करावे.

कृती ३)बातमीवर आधारित प्रश्न विचारून काय बोध झाला हे विद्यार्थ्याकडून जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.

जिल्ह्यातील १००० कोरोनामुक्त गावातील शाळांची वाजणार घंटा

अलिबाग : जयंत धुळप

रायगड जिल्ह्यातील १००० गावे कोरोनामुक्त झाली असून येत्या बुधवार पासून या सर्व गावांतील इयत्ता ८ वी ते १२ वीचे वर्ग असणाऱ्या शाळा सूरु होणार असल्याची माहिती रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दैनिक 'पुढारी'शी बोलताना दिली आहे.

शाळा सुरु करण्यापूर्वी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची आरटीपीसाआर चाचणी करुन ते कोरोना निगेटिव्ह असल्याचा अहवाल मुख्याध्यापकांनी घेणे अनिवार्य आहे. कोरोना पॉझिटिव्ह शिक्षक वा कर्मचारी यांना शाळेत प्रवेश देण्यात येऊ नये अशा सक्त आदेश देण्यात आले असल्याचे डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांत एकुण १९१४ गावे असून त्यापैकी १००० गावे कोरोनामुक्त झाली आहेत. आरोग्य यंत्रणा, रायगड जि.प.प्रशासन ,जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोरोनामुक्तीकरीता घेतलेल्या अथक परिश्रमातून हे यश साध्य झाले आहे. येत्या काळात सद्यस्थितीत कोरोनाग्रस्त असलेली ९१४ गावे देखील कोरोनामुक्त होतील असा विश्वास डॉ.पाटील यांनी व्यक्त केला आहे.कोरोना निर्बंधामुळे मुलांना घराच्या बाहेर पडण्यास मिळाले नाही. वर्गमित्र ही संकल्पनाच संपुष्टात आल्या सारखे झाले होते. परिणामी बुधवारी शाळा सुरु होणार असल्याने मुलांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

सक्षम बनू या :-

कृती १) विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील संवेदनशील मुद्द्याचे जाणीवपूर्वक वाचन करून दाखवणे.

कृती २) बातमीचे महत्व मुलांना सांगावे.

कृती ३) बातमी बाबत कोणते मुद्दे महत्वाचे आहेत व ते कशा पद्धतीने मांडले जातात याची माहिती उदाहरणासह स्पष्ट करावी

कृती४) विद्यार्थ्यांनी स्वत:च्या भाषेत बातमीबद्दल व्यक्त व्हावे

सराव करू या:-

कृती१) विविध प्रकारचे साहित्य जसे वर्तमानपत्र, मासिके, कथासंग्रह... इत्यादी वाचनासाठी उपलब्ध करून देणे यावर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणावी.

कृती २) संवेदनशील प्रसंग कथा संवाद इत्यादी वाचन करून याबाबत चर्चा घडवून आणून त्यांचेमत मांडण्यास सांगणे.

कृती ३) विद्यार्थ्यांनी शाळेत घडलेले विविध कार्यक्रम, परिसरात घडलेली घटना यावर बातमी तयार करावी.

कृती ४) विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रातील येणाऱ्या विविध बातम्या वाचाव्यात.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - भाषाभ्यास
कौशल्य / कृती : - समानार्थी / विरुद्धार्थी शब्द **दिवस : - तेहतीसावा**

अध्ययन निष्पत्ती :

इयत्ता सहावी – ६.१६.२०

जाणून घेऊ या :

१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही परिचयाचे शब्द द्यावेत व त्याला पर्यायी शब्द विचारावा .

जसे – घर , फुल , पाणी

घर – सदन

याप्रकारे **समानार्थी** शब्दांची ओळख विविध उदाहरणाने द्यावी.

१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांना काही परिचयाचे शब्द द्यावेत व त्याला विरुद्ध अर्थ असणारा शब्द विचारावा .

जसे – जवळ , अंधार , गोड

अंधार × उजेड

याप्रकारे **विरुद्धार्थी** शब्दांची ओळख विविध उदाहरणाने द्यावी.

सक्षम बनु या :

शिक्षकांनी खालील प्रमाणे सराव घ्यावा .

समानार्थी शब्द लिहा .

१)प्रेम –

२)डोळे –

३)पक्षी –

४)झाड –

विरुद्धार्थी शब्द लिहा .

१)चढणे ×

२)मावळणे ×

३)चांगला ×

४)मऊ ×

चला सराव करु या :

समानार्थी शब्द जोड्या लिहा. (इ.६ वी पान २७)



विरुद्धार्थी शब्द जोड्या लिहा. (इ.५ वी पान ५४)



इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - भाषाभ्यास
कौशल्य / कृती : - नाम व सर्वनाम क्षमता वाचन, लेखन **दिवस : - चौतिसावा**

अध्ययन निष्पत्ती :

05-1609, 05-16-11, 061620, 06.1646

जाणून घेऊ या :

विद्यार्थ्यांना 'कोणत्याही वस्तू, व्यक्ती, प्राणी यांची नावे सांगा' असे म्हणत बोलण्यास प्रवृत्त करावे. त्यांनी सांगितलेलीनावे फळ्यावर लिहावीत. ही सर्व नामे आहेत हे स्पष्ट करून सांगावे.एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या मित्राबद्दल ४-५ वाक्ये बोलायला सांगावे. ही वाक्ये फळ्यावर लिहावीत.

उदा.सोनल माझी मैत्रीण आहे. ती खूप हुशार आहे.

ती चांगली खेळाडू आहे. तिला वेळ वाया घालवणे आवडत नाही.

- यातील पहिल्या वाक्यात आलेले 'सोनल' हे नाव पुढीलवाक्यांमध्ये तसेच न येता त्याऐवजी ती, तिला हे शब्द आले आहेत. यावरून सर्वनाम ही संकल्पना स्पष्ट करावी.

सक्षम बनु या :

मला, माळ, हा, हार, हात,
ली, तू, तूरडाळ, तुझा,
मी, मीठ, झाउ, दरवाजा,
[illegible]

चौकटीत दिलेल्या शब्दांतून नामे व सर्वनामे वेगवेगळी करून लिहा. यातील प्रत्येक नाम व सर्वनामाचा वाक्यात उपयोग केलेले एकेक वाक्य लिहा.

चला सराव करु या :

●खालील वाक्यातील नामे ओळखून लिहा.

१) लांडगा हा जंगली प्राणी आहे.

२) त्यांच्या शेतात वाघ आला होता.

3) रामा घर स्वच्छ ठेवतो.

४)मला गावात राहायला आवडते.

५) हा माझा कागद आहे.

●वरील पाचही वाक्यातील सर्वनामे शोधून लिहा.

●आम्ही, तुम्ही, ही, मी, ती, त्या, तू या प्रत्येक सर्वनामाचा वाक्यात उपयोग करून लिहा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - क्रियापदाचा लेखनात वापर **दिवस : - पस्तीसावा**

अध्ययन निष्पत्ती-

पाचवी:-05.16.09 आणिसहावी:-06.16.20

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील चित्रे दाखवावीत व या चित्रांमधील मुले कोणती क्रिया करत आहेत ते शोधायला सांगावे व त्या क्रियेचे वर्णन करणारे क्रियापद लिहायला सांगावे .या क्रियापदावरून तयार होणारे वाक्य विद्यार्थ्यांना लिहायला सांगून त्या वाक्यातील क्रियापद अधोरेखित करायला सांगावे.



उदा-वरीलचित्र

क्रियापद:-हसणे

वाक्य :-मुलगी **हसत आहे.**

याप्रमाणे पुढील चित्रे विद्यार्थ्यांना दाखवा व कृती करून घ्या.



शिक्षकांनी वरील चित्रावरून विद्यार्थ्यांकडून वाक्ये लिहून घ्यावीत.विद्यर्थ्यांनी लिहिलेली वाक्ये वाचावीत व विद्यार्थ्यांनी क्रिया ओळखून योग्य क्रियापदांचा वापर केला आहे की नाही व क्रियापदे अधोरेखित केली आहेत की नाही ,क्रियापदांचा योग्य वापर केला आहे का? त्यावरून क्रियापदांची ओळख व क्रियापदांचा लेखनातील वापर यासंबंधी विद्यार्थ्यांना जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना क्रियापदाविषयी व क्रियापदांच्या लेखनातील वापरासंबंधी पुढील मार्गदर्शन करावे.

वाक्यात कोणती क्रिया केली आहे हे आपल्याला क्रियापदामुळे कळते पण त्यामुळे वाक्याचा अर्थपूर्ण होतो हे महत्त्वाचे.

1)ज्या शब्दामुळे केलेली क्रियातर कळतेच पण वाक्याचा अर्थही पूर्ण होतो त्याला वाक्याचे क्रियापद म्हणतात'.

2)वाक्याचा अर्थपूर्ण करणे क्रियापदाचे मुख्य काम आहे, वाक्यात त्याची जागा कुठे आहे ही गोष्ट महत्वाची नसते .

3)बहुतांश वाक्यात क्रियापद शेवटी येते पण प्रश्नार्थक वाक्यात ते मध्येही येते. उदाहरणार्थ: त्याने आंबा खाल्ला का? या वाक्यात खाल्ला हे क्रियापद मध्ये आले आहे.

सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून सरावासाठी पुढील कृती करून घ्यावी.

पुढे कंसात दिलेल्या क्रियापदांमधील योग्य अर्थाचे क्रियापद योग्य त्या रूपात वापरून पुढील वाक्ये पूर्ण करा.

(घालणे, फवारणे ,तोडणे,लावणे,)

अ)चिंगीने घरासमोर आंब्याची झाडे .....

ब)आंब्याच्या झाडांना तिने तीन-चार वर्ष गरजेनुसार पाणी .....

क)आंब्याच्या झाडाला मोहोर आल्यावर त्यावर तिने औषध .....

ड) आंब्याच्या झाडाला आंबे आले आल्यावर तिने ते सर्व आंबे.....

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - संभाषण / वाचन
कौशल्य / कृती : - नाट्यीकारण दिवस : - छत्तीसावा

अध्ययन निष्पत्ती५-.१६.०१,५.१६.०३/ ६.१६.११,६.१६.१२

जाणून घेऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील संवाद वाचण्यास सांगावा व त्याचे नाट्यीकरण करून घ्यावे.

•विद्यार्थी नाट्यीकरणात कितपत सहभाग घेतात? सादरीकरण कसे करतात हे शिक्षकांनी जाणून घ्यावे.

संवाद –

आई – रमा, दारापुढे पणत्या लाव बघू.
रमा – पणत्यांनी घर किती छान दिसतंय ना!
कुमार – आई, दारात रमाने सुंदर रांगोळी काढली आहे.
आई – हो आणि तू केलेला किल्ला पण, अंगणात छान दिसतोय.
रमा – चल दादा, मी तुला ओवाळते.
कुमार – हे बघ, मी तुझ्यासाठी काय आणलय
रमा – काय आहे बघू?
कुमार – ही बघ रंगपेटी. तुला चित्र रंगवायला आवडतात ना!

सक्षम बनू या

•शिक्षकांनी नाट्यवाचन व नाट्यीकरण कसे करावे याविषयी मार्गदर्शन करावे.

- नाटकाचा विषय, पात्रे, त्यांचे संवाद, वेशभूषा, देहबोली, हावभाव व आवाजातील चढ- उतार, स्पष्ट अचूक उच्चारासह नाटिकेचे वाचन, सादरीकरण, रंगमंच, नेपथ्य इ.

•शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील/ बालसाहित्यातील नाटकांची योग्य निवड करून विद्यार्थ्यांचे नाट्यीकरण करून घ्यावे.

• फुलपाखरू आणि मधमाशी या पाठाचे साभिनय नाट्यीकरण करवून घ्यावे.

सराव करु या

• विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील, वाचलेल्या गोष्टींच्या पुस्तकावर आधारित नाटिकांचा गटात सराव करावा.

• सुरूवातीला निवडलेल्या नाटिकेचे पात्रानुरूप नाट्यवाचन करण्याचा सराव करावा.

• नाट्यवाचनाचा पुरेसा सराव झाल्यानंतर नाट्यीकरण बसवावे. शेवटी निवडलेल्या नाटिकेचे साभिनय सादरीकरण करावे.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - प्रसंगलेखन **दिवस : - सदतीसावा**

अध्ययन निष्पत्ती-

पाचवी:-05.16.08 आणि 05.16.10सहावी:-06.16.18

जाणून घेऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिवाळी, गणेशोत्सव, ईद,बैलपोळा ,नाताळ या सणांची चित्रे द्यावीत व मुलांना पुढील त्यांची उत्तरे देण्यास सांगावीत.)

1)दिवाळी या सणाला तुमच्या घरी कोण-कोणत्या वस्तू व पदार्थ करतात ते लिही?

2) गणेशोत्सवात आरास करण्यासाठी कोणकोणत्या वस्तू वापरतात ते लिही?

3 ज्या सणांच्या दिवशी प्राण्यांची पूजा केली जाते त्यांची यादी कर.

4)ज्या सणांच्या दिवशी झाडे ,पाने फुले यांचा वापर व पूजा केली जाते त्यांची यादी कर.

5)झेंडावंदन कोणकोणत्या सणांच्या दिवशी केले जाते त्या सणांची नावे लिही.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी लिहिलेली उत्तरे वाचून विद्यार्थ्यांना सण- उत्सव याबाबत कितपत माहिती आहे हे जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

शिक्षकांनी विविध धर्म व प्रदेशात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणांची माहिती, महत्त्व व पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना सांगावी

(सणांचे नाव ? कोणत्या धर्मात साजरा केला जातो? कोणते पदार्थ केले जातात? कश्या पद्धतीने साजरा केला जातो? कोणत्या महिन्यात साजरा करतात? सणाचे धार्मिक ,सामाजिक ,शास्त्रीय व राष्ट्रीय एकात्मता यादृष्टीने महत्व)

सराव करू या

शिक्षकांनी सरावासाठी विद्यार्थ्यांकडून पुढील कृती करून घ्यावी.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या घरीजे सण साजरे होतात त्यांची नावे लिहिण्यास सांगावीत व त्यातील त्यांच्या सर्वांत आवडत्या सणाविषयी माहिती लिहिण्यास सांगावी

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - माझा शब्दसंग्रह दिवस : - अडतीसावा

अध्ययन निष्पत्ती५-.१६.०७ ,५.१६.११/६.१६.२१,

जाणून घेऊ या

•शिक्षकांनी फळ्यावर पुढील पाच शब्द लिहावेत. विद्यार्थ्यांना वर्णानुक्रमे हे शब्द लावण्यास सांगावे.

मधमाशी , फुलपाखरू, ससा, हत्ती, मोर

•विद्यार्थी शब्दांचा योग्य वर्णानुक्रम लावतात का हे जाणून घ्यावे.

सक्षम बनू या

• शिक्षकांनी मराठी शब्दकोशाचा परिचय करून द्यावा. शब्दकोशात शब्द कसे शोधावेत याबद्दल मार्गदर्शन करावे.

•शब्दकोशात शब्दांची मांडणी ही अकारविल्हेनुसार असते. मराठी मुळाक्षरे अ ते ज्ञ या क्रमाने आहेत. त्यांचा अनुक्रम लक्षात घेऊन शब्दांच्या आद्याक्षरांची उतरती मांडणी केलेली असते.यासाठी क्रमवार मुळाक्षरे व बाराखडी ही लक्षात घ्यावी लागते.

•शिक्षकांनी फळ्यावर काही शब्द लिहावेत व विद्यार्थ्यांना वर्णानुक्रम लावण्यास सांगावे.

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माझा शब्दसंग्रह ही वही करण्यास सांगावी. यावहीत वर्षभर पाठ्यपुस्तकातील सर्व पाठांतील परिचित व अपरिचित शब्द व त्यांचे अर्थ यांचा संग्रह करण्यास सांगावे.

सराव करू या

• विद्यार्थ्यांनी दररोज माझा शब्दसंग्रह या वहीतील ५ शब्दवर्णानुक्रमे लावण्याचा सराव करावा.

• माझा शब्दसंग्रह यावहीतील शब्दांचा वाक्यात उपयोग करून लिहा.

• विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकातील, पाठ्यपुस्तकेतर साहित्यातील, गोष्टीतील, मासिकातील बालसाहित्यातील आलेले अपरिचित शब्दांचा अर्थ मराठी शब्दकोश, ज्ञानकोश ,बालकांसाठी संस्कृतीकोश यात शोधण्याचा सराव करावा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - फलक वाचन दिवस : - एकोणचाळीसावा


अध्ययन निष्पत्ती-१) ५.१६.०५, ५.१६.०६२) ६.१६.१०

जाणून घेऊ या :-

१) शाळेतील विविध सूचनाफलक मुलांना दाखवावेत आणि त्यावर चर्चा करावी.

२) फलकांवरील सूचनांचे वाचन करून घ्यावे.

३) फलकावरील वाचन करून घेताना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लक्षात घ्यावा.



सक्षम बनू या :-

१) शिक्षकांनी विविध सूचना फलकाचे नमुने मुलांना दाखवून त्या फलकावरील सूचना याबाबत मुलांबरोबर चर्चा करावी.

२) वेगवेगळ्या ठिकाणच्या फलकावरील सूचनातील वेगळेपणा विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावा.

३) सूचना फलकाचे महत्त्व मुलांना समजावून सांगावे.

४)आपल्याला आजूबाजूला परिसरात, सार्वजनिक ठिकाणी असे सूचनाफलक कुठे कुठे दिसत आहेत त्याविषयी मुलांबरोबर चर्चा करावी.

५)मुलांना आपापले प्रतिसाद देण्यास प्रोत्साहन द्यावे.

सराव करू या :-


१)शिक्षकांनी मुलांकडून फलकाचे वाचन करून घ्यावे, त्यावर प्रश्न विचारून मुलांना किती आकलन झाले हे तपासावे. उदाहरणार्थ. हा फलक कुठे असेल? या सूचना कोणी लिहिल्या असतील ?फलकावर काही शुद्धलेखनाच्या चुका आहेत का?

२)शिक्षकांनी विविध सूचना फलकाचे नमुने निवडावेत व वाचनाचा सराव घ्यावा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - सूचनालेखन **दिवस : - चाळीसावा**

अध्ययन निष्पत्ती :
05.16-09, 05:1610, 05 1611, 0616-04,061610, 061616, 0416

जाणून घेऊ या :
विद्यार्थ्यांना सूचनाफलक वाचण्यास सांगावे. यासारखा सूचनाफलक तयार करण्यास सांगावे.



सक्षम बनु या :
सार्वजनिक ठिकाणी सूचनाफलक का लिहिले जातात, त्यातील सूचनांचे पालन करणे का गरजेचे असते, सूचनाफलकांचे महत्त्व काय इत्यादींबाबत विद्यार्थ्यांना माहिती द्यावी. चर्चा घडवून आणावी.सूचना कशा असाव्यात, त्यांची वाक्यरचना, नेमकेपणा,भाषा, आकर्षकता यांसंबंधी मार्गदर्शन करावे. तसेच सूचनाफलक लावण्याची जागा कशी निवडावी/ ठरवावी याबाबत मार्गदर्शन करावे.

चला सराव करु या :
●तुमच्या परिसरातील सूचनाफलक वाचा.●बसमध्ये तुम्ही वाचलेल्या सूचना लिहा.●लसीकरण केंद्रावरील सूचनाफलक तयार करा.●कोरोनामुळे उद्भवलेली स्थिती बदलल्यावर बंद शाळापुन्हा सुरू होतील, तेव्हा शाळेत कोणकोणत्या सूचनांचे फलक लावावे लागतील, त्या सूचना तयार करून लिहा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - वाचन
कौशल्य / कृती : - मूकवाचन दिवस : - एकेचाळीसावा

अध्ययन निष्पत्ती१-) ५.१६.०६२) ६.१६.१४

जाणून घेऊ या : -

१)शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून एक नमुना उताऱ्याचे मूक वाचन करून घ्यावे. अगोदर आवश्यक सूचना द्याव्यात.(उदा. मोठ्या आवाजात वाचू नये, मनात वाचन करावे, समजपूर्वक वाचन करावे.)

२)विद्यार्थ्यांनी मूक वाचन केल्यानंतर त्याउताऱ्यावर आधारित चर्चा करून सर्वांना प्रश्न विचारावेत, विद्यार्थ्यांचे आकलन किती झाले आहे हे जाणून घ्यावे.

(इयत्ता - ५वीसुलभभारती पृष्ठ क्र.३९ नमुना उतारा)



सण, नवीन कपडे, गोडधोड पदार्थ, चर्च, सांताक्लॉज, ख्रिसमस ट्री.

आपण अनेक सण साजरे करतो. तसेच ख्रिश्चन बांधव प्रभू येशूचा जन्मदिवस नाताळ सण म्हणून साजरा करतात. ते या सणाला नवीन कपडे घालतात. चर्चमध्ये जातात. प्रार्थना करतात. एकमेकांना शुभेच्छा देतात. शुभेच्छा देताना 'मेरी ख्रिसमस' असे म्हणतात. ख्रिसमस ट्रीवर दिव्यांच्या माळा, फुले, चांदणी यांची सुंदर सजावट करतात. आपल्या मनातील इच्छा सांताक्लॉज पूर्ण करतो, असे मुलांना वाटते. या सणाच्या दिवशी घरात डोनट, केक यांसारखे गोडधोड पदार्थ बनवले जातात. प्रभू येशूच्या शिकवणुकीनुसार ते गोरगरिबांना वाटले जातात. त्यांनाही आनंदात सहभागी करून घेतले जाते.

सक्षम बनू या:-

१) विद्यार्थ्यांचे आकलन क्षमता वाढवण्यासाठी स्मरणात कसे ठेवावे, अवधानपूर्वक कसे वाचावे... इत्यादी बाबी त्यांना समजावून सांगाव्यात.

२) मूक वाचन करताना येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यावर योग्य ते मार्गदर्शन करून त्यांची आकलन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न करावा.

सराव करू या :-

विद्यार्थ्यांच्या वयानुरूप व भावविश्वाशी जवळीक असणारे उतारे उपलब्ध करून द्यावेत व त्यांच्याकडून समजपूर्वक मूकवाचनाचा सराव करून घ्यावा.

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - मुद्द्यावरून गोष्ट लेखन **दिवस : - बेचाळीसावा**

अध्ययन निष्पत्ती-

पाचवी:-05.16.08 आणि 05.16.10सहावी:-06.16.18

जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुढील मुद्दे गोष्ट लेखनासाठी फळ्यावर लिहून द्यावेत. शिक्षकांनी पुढील मुद्द्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना गोष्ट लिहिण्यास व ती लिहून झाल्यावर गोष्टीला योग्य असे नाव देण्यास सांगावे.

मीना -मध गोळा करण्यासाठी जंगलात जाते- रस्ता चुकते- रस्ता सापडत नाही-अधिक घनदाट भाग- सायंकाळ – घराची आठवण व आईबाबांची काळजीचा विचार- घाबरते – वनखात्याचे कार्यालय- वनकर्मचारी घरी आणून सोडतात – आईबाबा आनंदी

वरील मुद्द्यांवर आधारित विद्यार्थ्यांकडून गोष्ट लिहून घ्यावी. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या गोष्टी वाचाव्यात व विद्यार्थ्यांना मुद्द्यांवर आधारित गोष्ट लिहिता येते की नाही हे त्यावरून जाणून घ्यावे

सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गोष्ट लिहिण्याविषयी व ती लिहिताना मुद्द्यांच्या वापरासंबंधी पुढीलप्रकारे मार्गदर्शन करावे.

1)मुद्द्यांमध्ये दिलेल्या व्यक्तींचे सविस्तर वर्णन करावे (नाव,बाह्यरूप, स्वभाव)

2)मुद्द्यांमध्ये स्थळनिसर्ग), गाव,बाजार,शाळा, बाग वगैरे) दिले असेल तर त्या स्थळाचे वर्णन करावे.

3)मुद्द्यांवरून गोष्टीची मध्यवर्ती कल्पना निश्चित करावी.

4)गोष्टपूर्ण होण्यासाठी संबंधित पात्रांची निवड करावी ,पात्रे मर्यादित असावेत.

5)मुद्द्यांचे बारकाईने निरिक्षण करून घटनेचा क्रम निश्चित करावा.

6)घटनेची सुरुवात- समस्या – समस्येची सोडवणूक – समाधानकारक शेवट असा सर्वासाधारण क्रम असावा.

7)गोष्टीला अनुरूप नाव द्यावे.

(थोडक्यात :-कथेची सुरुवात --- कथेचा मध्य --- कथेचा शेवट)

(कथेला या सर्व बाबी असतात तर. या प्रत्येक बाबीचा विचार करत असताना कथेची भाषाकथेमध्ये,प्रसंग,पात्र, एक समस्या निर्माण होते ती हळूहळू सुटत जाते. आणि शेवट होतो अशी कथा आम्हाला लिहायची आहे. त्यासाठी खालील मुद्यांच्या आधारे आपण कथा लिहू शकतो.)

सराव करू या

शिक्षकांनी पुढील मुद्दे फळ्यावर थोडक्यात लिहून ग्राफ फळ्यावर काढावा व विद्यार्थ्यांना गोष्ट लिहिण्यास सांगावी..

1)शेतकरी- आंब्याची बाग लावली- शेळ्या-मेंढ्या आंब्याची झाडे खाऊ लागली-बागेला निवडुंगाचे कुंपणबागेला- संरक्षण-बाग मोठी झालीखूप- आंबे –खूप उत्पन्न –शेतकऱ्याचा मुलगा मोठा झाला- बाग व बागेचा जमाखर्च – मुलगा मूर्ख व अविचारी- निवडुंगाचा उपयोग नसल्याने निवडुंग तोडतोबागेतील- झाडांची शेळ्या –मेंढ्या व लोकांकडून फळांची चोरी व नासधूसउत्पन्न- कमी- चूक कळते

1)शिक्षकांनी पुढील शब्दांच्या आधारे विद्यार्थ्यांना गोष्ट लिहायला सांगावी.

(बाग ,डबा, शाळा ,संध्याकाळी)

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - अनुभवलेखन **दिवस : - त्रेचाळीसावा**

अध्ययन निष्पत्ती :

05.16 08, 05-16-03, 05 16-10, 05 16 19, 06-16-02-306-16-04,06 16 16, 06 16-17.06-16-20

जाणून घेऊ या :

विद्यार्थ्यांना जीवनात आलेले विशिष्ट अनुभव व त्यावर आधारित त्यांच्या प्रतिक्रियांविषयी प्रश्नोत्तर माध्यमातून संवाद साधावा.

उदा. - १) तुम्ही तुमचे पहिले भाषण कधी केले?

२) त्या दिवशी काय-काय घडले?

3) भाषण करतांना आणि भाषण संपल्यानंतर तुमच्या मनात कोणते विचार आले ?

या प्रश्नांचा संदर्भ घेऊन 'माझे पहिले भाषण' याविषयी अनुभव लिहिण्यास सांगावे.

वरील प्रश्नांऐवजी 'माझा वाढदिवस', 'शाळेतील पहिला दिवस' यांसारख्या विषयांवर प्रश्न विचारूनही विद्यार्थ्यांना अनुभव लेखनाबाबत मार्गदर्शन करून लेखन प्रवृत्त करता येईल.

सक्षम बनु या :

आपल्या दैनंदिन जीवनात आलेल्या विशिष्टअनुभवांचे लेखन करतांना कोणत्या मुद्यांचा विचार करावा, वर्णन लिहितांना मुद्यांची मांडणी कशी करावी तसेच अनुभवाचे ठिकाण, वेळ, पात्रे, लेखनालील वाक्यरचना, भाषा यांबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करून मार्गदर्शन करावे.अशा विविध मुद्यांचा वापर करून लेखन प्रभावी होण्याविषयी मार्गदर्शन करावे. अनुभव लेखनाचा नमुना वाचून दाखवता येईल.

चला सराव करु या :

- 'कोरोना काळातील माझा अनुभव' याविषयी आठ-दहा वाक्येलिहा.
- 'अचानक आलेला पाऊस' या विषयी तुमचा अनुभव लिहा.
- सायकल शिकतांना तुम्हाला आलेला अनुभव लिहा

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - लेखन
कौशल्य / कृती : - निबंधलेखन **दिवस : -चव्वेचाळीसावा**

अध्ययन निष्पत्ती :

65 1608,05 15:03, 05-16 14, 0-5-1611,06-16-12,0616-06,061616

जाणून घेऊ या :

विद्यार्थ्यांना निबंधाचा एक विषय देऊन त्या विषयाशी संबंधित मुद्दे फळ्यावर लिहून द्यावेत. प्रत्येक मुद्ध्याशी संबंधित प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांकडून आलेल्या उत्तरातील वाक्यांचे एकत्रीकरण करून सात-आठ ओळींचा निबंध कसा लिहिता येतो, हे स्पष्ट करून सांगावे.

उदा.- माझा आवडता प्राणी

प्राण्याचे नाव, त्याची माहिती, उपयोग, वैशिष्टे का आवडतो इत्यादी मुद्द्याआधारे निबंध लिहिण्यास सांगावे.

सक्षम बनु या :

विद्यार्थ्यांनी लिहिलेला निबंध तपासून आवश्यक तेथे बदल सुचवावेत.

दिलेल्या विषयावर निबंध लिहिता येण्यासाठी -विषयानुरूप मुद्यांचा विचार करणे, त्या मुद्यांचा योग्य क्रम लावूनत्यांची सुसंगत मांडणी करणे, आकर्षक सुरुवात, प्रभावी भाषा,आलंकारिक तसेच नवीन शब्दांचा वापर आणि शेवट आकर्षक /समर्पक कसा करावा यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करावे.

निबंधलेखन कौशल्य सरावाने आत्मसात करता येते,त्यासाठी अवांतर वाचनही महत्त्वाचे असते हे विद्यार्थ्यांना पटवून द्यावे.

'माझी शाळा' (शाळेचे नाव, स्थळ, शाळेत प्रवेश, शाळेची वैशिष्ट्ये, शाळा का आवडते, शाळेबद्दल काय वाटते इ. मुद्द्याआधारे विद्यार्थ्यांनी निबंध लिहावा.)

चला सराव करु या :

विद्यार्थ्यांचे गट तयार करून निबंध लेखनासाठी प्रत्येक गटाला एक-एक विषय धावा. गटात चर्चा करून विद्यार्थ्यांनी निबंध लिहावा.

निबंधाचे पुस्तक मिळवून त्यातील निबंध वाचा

विषय –

१) माझा आवडता खेळ.

2)माझा गाव किंवा माझे शहर

इयत्ता :- ६ वी
क्षेत्र : - श्रवण / भाषण संभाषण / वाचन / लेखन
कौशल्य / कृती : - चाचणी क्रमांक – ३ गुण – ३० दिवस : - पंचेचाळीसावा

---

१)खालील वाक्यात 'लिहिला' या शब्दानंतर कोणते विरामाचिन्ह येईल ? १ गुण

मी पावसाळा या विषयावर निबंध लिहिला

अ)स्वल्पविराम

ब)पूर्णविराम

क)प्रश्नचिन्ह

ड)उद्गारचिन्ह

२) रामाला गणित विषय खूप आवडतो.या वाक्यातील क्रियापद कोणते? १ गुण

अ) राम

ब)गणित

क)खूप

ड)आवडतो

३)'डोळे भरून येणे' या वाकप्रचाराचा योग्य अर्थ कोणता ? १ गुण

अ)आनंद वाटणे

ब)रडू येणे

क)अपमान वाटणे

ड)सुरुवात होणे

४)कोणतीही दोन विरामचिन्हे काढून त्यांच्यासमोर त्यांची नावे लिही . १ गुण

१) ---------- २) ----------

५)खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करून प्रत्येकी एक वाक्य लिहा. २ गुण

१)पतंग - ----------

२) घर – ----------

६)समानार्थी शब्द लिही. २ गुण

१) नभ - ---------- २) दिन - ----------

७)खालील वाक्यातील नामे ओळखा . २ गुण

१) स्वराली हुशार मुलगी आहे. ----------

२) साकेत आणि स्वानंद धावत होते . ----------

८)क्रियापदाचा वापर करून वाक्य पूर्ण करा. २ गुण

१)वरद घरी ----------

२)तुषार पुस्तक ----------

९)कोण कोठे राहतो ते लिहा २ गुण

(गोठा , घरटे , गुहा , नदी)

१)मासा ----------

२)पक्षी ----------

३)सिंह ----------

४)गाय ----------

१०) खालील सर्वनामाचा वाक्यात उपयोग करा . २ गुण

१)माझे - ----------

२) आम्ही ----------

११)खाल्ला या क्रीपादाचा वापर करणारी दोन वाक्ये लिहा . २ गुण

१)----------

२)----------

१२)प्राणीसंग्रहालयात प्रवेश करताना कोणत्या सुचना असाव्यात कोणत्याही दोन सूचना लिही २ गुण

१)----------

२)----------

१३) निकिताने आंबे खाल्ले या वाक्यावर आधारित दोन प्रश्न तयार करा २ गुण

१)----------

२)----------

१४) बागेमध्ये कोणत्या सुचना असाव्यात कोणत्याही दोन सूचना लिहा २ गुण

१)----------

२)----------

१५)माझा आवडता पक्षी या विषयावर निबंध लिहा ३ गुण

---

१६)सायकल शिकताना तुम्हाला आलेला अनुभव लिहा ३ गुण
